नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'विदर्भ-साहित्य-संघा'चें मुखपत्र

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
... ग्रंथ संग्रह

आजच्या अंकांत—

★ कविवर्य Bee
★ काकासाहेब कालेलकर
★ प्रा. पु. शि. रेगे

युगवाणी

वार्षिक वर्गणी
पांच रुपये
※
किरकोळ अंक
आठ आणे

संपादक : वामन नारायण देशपांडे

एप्रिल १९४६

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

संपादकीय पत्रव्यवहाराचा पत्ता—
वामन नारायण देशपांडे
संपादक 'युगवाणी'
यवतमाळ [वऱ्हाड]

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी

वर्गणी, जाहिराती यासंबंधीं पत्रव्यवहाराचा पत्ता—
प्रा. नारायण कृष्ण दिवाणजी एम्. ए.
सरचिटणीस,
वि. सा. संघ, अमरावती.

वर्ष १ लें
अंक ४ था

एप्रिल १९४६

वार्षिक वर्गणी रु. ५
किरकोळ अंकास ॥-

अनुक्रमणिका

			पृष्ठ
कविता—			
१	प्रिति	Bee	१
२	दोन कविता	प्रा. पु. शि. रेगे बी. एस्सी.	२
३	परिवर्तन	नारायण बाळाजी शास्त्री	२
४	साद-पडसाद	द. चिं. सोमण	३
साहित्यिकाचा परिचय—			
१	वासुदेव विष्णु मिराशी	वा. ना. देशपांडे	४
कथा—			
१	तीन तऱ्हा	शं. बा. शास्त्री	७
प्रबंध—			
१	हिंदुस्तानीची नीति	काकासाहेब कालेलकर	११
ललितगद्य—			
१	हात लावला की सोनें	गो. रा. दोडके, बी. ए.	१६
विविध—			
१	उर्दू काव्यांतील इक्बालची महात्मता	व. अ. शहाणे	२२
२	ग्रस्त सरस्वती		२५
३	संपादकीय		२७

चुकीची दुरुस्ती

१. 'Bee-विशेषांकां' त पा. ७ वर रा. पेशवे हे प्रांतांतील संस्कृत व्याकरणाचे पहिले एम्. ए. होत, असा उल्लेख आला आहे. तो बरोबर नसल्याचें शोधाअंतीं कळतें.

२. 'युगवाणी' मार्च-अंक पान ३२, ओळ २ येथे 'प्रस्तावना' शब्दाऐवजीं 'अर्पण पत्रिका' हा शब्द वाचावा.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

युगवाणी

वर्ष १ लें	संपादक	एप्रिल
अंक ४ था	वामन नारायण देशपांडे	१९४६

प्रीति

अवश्य कर प्रीति तूं सहज धर्म हा वागतो.
परी समज अंतरीं बिकट चालतां मार्ग तो!
परस्परिं न राहतां समसमान आकर्षणें
तरी विरस मानसीं विषम चालतां वर्षणें! १

असे कुटिल प्रीति ती श्रुतिमनोहरा रागिणी
दिसे रुचिर. ती असे गरलधारिणी नागिणी!
असे द्विविध प्रीति ती: मलिन-भोग-कामाकुला,
तशीच दुसरी उषसम असे महन्मंगला! २

अशीच कर प्रीति जी सुपथ-दीपिका जीवनीं
गृहीं सुखद होतसे तशिच [१]शृंखला-बंधनीं!
समग्र पुरुषार्थ दे सुयश-कीर्ति, दे श्रेयसें
तसें शिकवि उज्ज्वलास्तव तुला मरावें कसें! ३

Bee

१ कंदंत

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

दोन कविता

(१)

दोन क्षणिका

डोळे मोडीत चालसी
 उभा गांव चालविसी
मागे वळून पाहसी
 उभा गांव चाळविसी

*

कसा उच्छादी हा वारा
 केळ झोडपून गेला
किती झाकशील मांडी
 नाही मर्यादा ग झाला

(२)

चार क्षणिका

डोकावले देतांना तूं
 बाळे ! आळोसेपिळोवे
झाल्या बाहीतून दोन
 कुणी चुकूर नवखे ! १

*

प्रतिपदेचा हा चंद्र
 आला शरमिंधा लाल
रातभर बसून
 पुरा थकला ग काल ! २

*

तुझ्या उभार वक्षाची
 नेहमीची ती थोरवी
नाही पटतच होतां
 शेजेवर तूं आडवी ! ३

*

उजाडलें मघाशींच
 कसं उठवूं ग तुला ?
आताशींच तर कुठे
 तुझा डोळा हा लागला ! ४

पुरुषोत्तम शिवराम रेगे

परिवर्तन

हाणा हातोडा !
उडवा शकलें
चूर्णविचूर्ण करा पदाघातें
स्फटिकचषक !
–दीप्ति जयाची दिपवी नेत्रां देई अंधारी–
आणि सांडूं या सम्मोही किमया अंतरंगींची
रक्तपुष्पाच्या* कृष्णहृदयीं
विषार्कमधु सम्पृक्त जैसा !
… … …

स्वैर विचरलों
स्वप्नसृष्टीच्या संधिप्रकाशीं
अद्भुतरम्य कथा तींतील
कोमल करें हळू हाताळल्या
भव्य उभविलीं स्वप्नमंदिरें तेजाचीं श्रद्धेचीं
आणि होतसे शिरीं आमुच्या
खपुष्पवृष्टि !
… … …

तोंच कर्णकटु विसंवादी स्वर
"विनाशकाल !"
… … …

उभे ठाकलों
विस्मित स्तिमित स्वप्नजड अन्ध
निनादे कानीं विकालतेचें भयाण हास्य
–मानवतेचें चाले क्रन्दन !
… … …

देखिलें आम्हीं :
अर्थहीनता थाटे सैराट अनर्थ करी
आणि स्थिरावले पाय आपुचे
अस्थिरतेच्या वालुका-द्वीपीं नैराश्यप्रवाहीं
–ऐका हो ऐका सम्बोधन-ध्वनि !
… … …

हा नरश्रेष्ठ जगद्बंधु हा
घडविलेला सुखदु:खांहीं
असीम आसक्ति-विरक्ति यांहीं

* Blood-red tulip

या हा मंदिर   आनंदानंदाचें   मंगलाश्रूंचें-
सावध ! ऐका   गभीर गर्जना   पथनिर्देशना
“ चोखाळा हा पथ
सत्य-पथ हा ! ”
हे कविश्रेष्ठा ! हो मार्गदर्शक !

Ernst Toller याच्या ‘Transfigura-tion’ मधील ‘Alarum’ चें भाषांतर.

नारायण बाळाजी शास्त्री

साद–पडसाद

एकाकीपणाची   जाणीव होऊन
साद कधी झाली   मनस्वी उद्विग्न
आणि पडसादा   साद घाली साद
सादेचे उठले   कोटि पडसाद !
‘पडसादा, ये ! ये !–   पडसाद कुठे ?’
अवकाशीं साऱ्या   कल्लोळ तो उठे !
तप्त वाळवंटीं   वाळूच्या वादळीं,
गहन काननीं   सरितांच्या जळीं,
अथांग सागरीं   भयाण कुहरीं,
विशाल अंबरीं   दिशांच्या उदरीं,

असंख्य सूर्यांच्या   तप्त डफांवर,
शशांच्या सोनेरी   भव्य झांजांवर,
ग्रहगोलांवरी   प्रभाळ सुंदर
नादले ते बोल   गभीर गभीर !
नादली ती वाणी   गुंजारवांतूनी,
स्वर्गी अप्सरांच्या   नूपुरीं कंकणीं,
कल्पद्रूमपर्णे   वदलीं ते बोल
सरस्वतीवीणा   आणिक मंजुळ
‘पडसाद कुठे ?’   म्हणे कालातून
चिरायु कालाचा   आणि क्षण क्षण !

—‘पडसाद कुठे ?’   पुसे विश्व सारें
शोधाया निघाले   स्वर्गांतील वारे,
लागले धावाया   व्योमगंगाजल,
त्वरित निघाल्या   तारका चपल,
रुद्रवीणाघोष,   शेषाचे फूत्कार,
स्वर्गकुसुमगंध   शोधिती आतुर
अवकाश पाही   तारांच्या नेत्रांनीं
अवघी निर्मिति   फिरूनी फिरूनी
तेजाचे किरण   लागले धुंडाया
लागला पळाया   काळहि तो वाया !

–अचानक आणि   होई विश्व शांत
सादेच्या सादेचा   पडसाद लुप्त !
अचानक आणि   झाली नभोवाणी–
–‘साद पडसाद   एकरूप दोन्ही !
प्रभूच्या अंतरीं   विश्वाची निर्मिति
विश्वनिर्मितींत   प्रभूचीच मूर्ति
पडसादीं वसे   सादेचीच साद
सादेंत वसतो   आणि पडसाद !
पडसाद कुठे ?   सादेच्या अंतरीं !
पडसाद बोले   सादेची वैखरी

नाममात्र भिन्न   साद पडसाद
एकरूप दोन्ही   पडसाद साद !!
ऐकूनी ती वाणी   आणि अर्थपूर्ण
सादेने मानिलें   स्वतःलागी पूर्ण !!
एकाकीपणाची   जाणीव नुरली
साद पुन्हा कधी   उद्विग्न ना झाली !

द. चिं. सोमण

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वासुदेव विष्णु मिराशी

वामन नारायण देशपांडे

महामहोपाध्याय प्राचार्य वा. वि. मिराशी व त्यांचें संशोधन-कार्य यांचा त्रोटक परिचय या लेखांत करून देण्यांत आला आहे. डॉ. विंटरनिट्झ, डॉ. कीथ यांच्यासारख्या विश्वविख्यात पंडितांनी ज्या मिराशींची स्तुति केली, त्यांचें संशोधन युरोपीय संशोधकांच्या पर्तीचेंच केवळ नव्हे, तर त्यांच्या तोडीचेंहि आहे, असें कोण म्हणणार नाहीं?

"राजशेखर व भवभूतींचें जन्मस्थान या विषयांवरील तुमच्या मनोरंजक व महत्त्वपूर्ण निबंधांच्या सुट्या प्रति तुम्हीं मजकडे पाठविण्याची कृपा केली, याबद्दल मी तुमचा फार आभारी आहें. सध्या मी माझ्या 'भारतीय साहित्याचा इतिहास' या ग्रंथाच्या इंग्रजी आवृत्तीच्या तिसऱ्या खंडाची सुधारलेली प्रत तयार करीत आहें. तींत तुमच्या या निबंधांचा संदर्भ देण्याची संधी लाभेल, याचा मला आनंद वाटतो."

—हें पत्र कुणीं कुणास लिहिलें असेल बरें? तें प्रेग विश्वविद्यालयाचे त्रिखंडकीर्ति संस्कृतपंडित डॉ. विंटरनिट्झ यांनी १० ऑक्टोबर १९३५ रोजीं प्राचार्य वा. वि. मिराशी यांस लिहिलें आहे. पत्र त्रुटित असून त्यांतील स्तुतिहि अतिशय संयमित आहे. परंतु इतरेजनांच्या स्तुतीच्या हजार शब्दांपेक्षा अधिकारी व्यक्तीचा स्तुतीचा एक शब्दहि अधिक किंमतीचा असतो! विंटरनिट्झ यांच्या तोडीचे दुसरे प्राच्यविद्याविशारद डॉ. कीथ यांनीहि मिराशी यांच्या 'नवसाहसांकचरिता' वरील निबंधाची ६ नोव्हेंबर १९३५ च्या पत्रांत तारीफ केलेली आहे. याशिवाय, डॉ. रँडल, डॉ. बार्नेट, सर रिचर्ड बर्नप्रभृति युरोपीय आणि रावबहादुर का. ना. दीक्षित, म. म. पां वा. काणे, रायबहादुर दयाराम साहनी, डॉ. मुजुमदारप्रभृति भारतीय विद्वान् यांनी मिराशींविषयीं वेळोवेळीं गौरवोद्गार काढले आहेत.

आणि, मिराशी यांनी प्राचीन इतिहासक्षेत्रांत जें संशोधन-कार्य केलें आहे, तें सर्वतोपरी प्रशंसा व्हावी, अशाच तोलाचें आहे.

कसें तेंच आपणास पाहावयाचें आहे.

(२)

प्राचार्य मिराशी हे नागपूर येथील सरकारी मॉरिस कॉलेजचे प्रमुख असले, तथापि ते मूळचे वऱ्हाड-मध्यप्रांतांतील रहिवासी नव्हत. मिराशी यांचा जन्म इ. स. १८९३ मध्ये रत्नागिरी जिल्ह्यांतील कुवळें गांवीं झाला. त्यांचे वडील कोल्हापुरास सरदार राशिंगकर यांजकडे नोकरीस होते. मिराशी लहान असतांच त्यांचे वडील वारले. यामुळे कुटुंबपोषणाची जबाबदारी त्यांचे बंधु सीतारामपंत यांजवर येऊन पडली. मिराशी हे अतिशय बुद्धिमान् असल्यामुळे त्यांना शालेय शिक्षणापासूनच शिष्यवृत्ति मिळण्यास सुरवात झाली. या व पुढील शिष्यवृत्तींमुळेच त्यांचें सारें शिक्षण पुरें होऊं शकलें! मिराशींचें इंटरपर्यंतचें शिक्षण कोल्हापुरास झाल्यानंतर, पुढील शिक्षणासाठीं ते पुण्याच्या डेक्कन कॉलेजांत गेले. अभ्यासांत वरची श्रेणी मिळवून त्यांनी 'सर लॅरिन्स जेंकिन्स प्राइझ,' 'सर जॉर्ज ली ग्रँड जेकब स्कॉलरशिप,' 'झाला वेदांत प्राइझ'—वगैरे किती तरी शिष्यवृत्ति वेळोवेळीं पटकावल्या! योग्य कालीं डेक्कन कॉलेजमधून मिराशी एम. ए. ची परीक्षा उत्तीर्ण झाले.

याच वेळीं मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेजमधील के. प्रो. घाटे हे विलायतेस गेले होते. त्यांच्या जागीं

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

१९१७ ते १९१९ हीं दोन वर्षे मिराशी यांची प्राध्यापक म्हणून नेमणूक झाली होती. पुढे १९१९ मध्ये मॉरिस कॉलेजांत संस्कृतचे प्राध्यापक म्हणून ते नेमले गेले. हल्ली ते त्या कॉलेजचे 'प्राचार्य' म्हणून काम करीत आहेत.

मिराशी हे शिस्तीचे भोक्ते असल्यामुळे विद्यार्थि-वर्गास ते कांहींसे करडे वाटतात. तथापि त्यांच्या अध्यापन-कौशल्यावर त्यांचे विद्यार्थि लुब्ध असतात. विद्यार्थ्यांसाठी त्यांनी 'हर्षचरितसार' व 'लघु-कौमुदी,' भाग पहिला, हीं पुस्तकें टीका-टिप्पणीं-सह तयार केलीं आहेत.

मिराशी हे प्राध्यापकाचे प्राचार्य झाले याचाच अर्थ हा की, त्यांनी आपली नोकरी उत्तम प्रकारें बजाविली. वाङ्मय किंवा सार्वजनिक कार्य करण्याच्या हव्यासांत नोकरीकडे दुर्लक्ष्य करणारे लोक थोडेथोडके नसतात ! मिराशी यांनी नोकरी चांगल्या प्रकाराने करून शिवाय वर श्रेष्ठ प्रतींचें संशोधनकार्यहि केलें, ही गोष्ट त्यांना अतिशय भूषणावह आहे, असें कोण म्हणणार नाही ?

(३)

मॉरिस कॉलेजांत असतांना मिराशी यांनी भावी संशोधन-कार्यासाठी स्वतःला पद्धतशीर रीतीने तयार केलें. त्यांचा संस्कृत भाषेचा व्यासंग गाढ होताच. पण कै. डॉ. सर रा. गो. भांडारकर यांच्या एका भाषणापासून स्फूर्ति घेऊन त्यांनी नागपूरचे प्रसिद्ध वैय्याकरणी कै. प्रा. गो. कृ. गर्दे यांच्याजवळ पातंजल महाभाष्याचें अध्ययन केलें. त्याचप्रमाणे, प्राचीन ताम्रपट, शिलालेख, व नाणीं संस्कृताखेरीज प्राकृतादि भाषांत असल्यामुळे त्यांनी त्यांचाहि अभ्यास केला. आणि, भारताच्या प्राचीन इतिहासाचा तर त्यांनी फारच बारकाईने व्यासंग केला. या इतिहासाचे कैक दुवे अद्यापि जोडावयाचे आहेत आणि त्यासाठी ताम्रपटादिकांचें संशोधन व संपादन करणें अत्यवश्य आहे, असें त्यांस दिसून आलें.

हें संशोधन जास्तींत जास्त विद्वानांपुढे येऊन त्याची शहानिशा होण्यासाठी तें इंग्रजी माध्यमांतून जगासमोर यावयास पाहिजे, अशी मिराशी यांची खात्री झाली. तदनुसार त्यांनी आपलें प्रमुख लेखन इंग्रजींतून केलें आहे. अर्थात् मराठीच्या वाट्याला मिराशींचें कांहींच लेखन आलें नाही, असें नाही. पण इंग्रजी लेखनाच्या मानानें त्यांचें मराठी लेखन थोडें आहे व तें प्रायः पद्यावरच आधारलेलें आहे. त्यांचें कांही मराठी लेखन स्वतंत्रहि आहे.

मिराशी यांचा आतापर्यंत ग्रंथ असा एकच प्रसिद्ध झाला असून, तोहि मराठीतच आहे. हा ग्रंथ 'कालिदास' नामक होय. या ग्रंथांत कालिदास व त्याच्या वाङ्मयकृति यांच्याविषयीं अद्यावत् माहिती अतिशय सरस भाषेत दिलेली आहे. अशा प्रकारचा ग्रंथ इतर भाषांतहि सहसा नसेल ! इंग्रजीत तर असा ग्रंथ खासच नाही.

मिराशींचा दुसरा ग्रंथ हिंदुस्थान सरकारच्या पुराण-वस्तु-संशोधन-खात्यातर्फे, लवकरच प्रसिद्ध होणार असून, त्याचें नांव 'Corpus Inscriptionum Indicarum' Vol. IV ('भारतीय कोरीव लेखांचा संग्रह' भा. ४) हें आहे. या ग्रंथांत कलचुरी-चेदि-शकाच्या कोरीव लेखांचा संग्रह केलेला असून त्यांत मूळ लेखांचें वाचन, इंग्रजी भाषांतर, इतिहास वगैरेंचें विवरण-इत्यादि अंगें येतील. या ग्रंथांत सुमारें शंभर कोरीव लेख संगृहीत केलेले आहेत.

याखेरीज मिराशी यांचे फुटकळ निबंध कितीतरी आहेत. प्रत्येक निबंधांत कांही ना कांही नवीन संशोधन हें आढळेलच ! किंबहुना, कांही तरी नवीन सांगावयाचें असल्याशिवाय मिराशी हातांत लेखणी धरीतच नाहीत! या चिमुकल्या लेखांत मिराशींच्या निबंधांचा सर्व परामर्ष घेणें अशक्य असल्याने त्यांच्या संशोधनपर लेखांमुळे कोणती नवीन माहिती उजेडांत आली, ती एकेक घराणें घेऊन — सांगतों:—

मौर्यः— अशोकाच्या धर्ममहामात्राचा एक लेख देवटेक (नागपूरपासून ५० मैल) येथे असल्याचें पुष्कळांस ठाऊक होतें. त्याचें वाचन प्रथम मिराशींनी केलें. त्यांत प्राण्यांना पकडणाऱ्यांस अगर मारणाऱ्यांस शासन होईल, असें जाहीर निवेदन आहे ['New Light on Deotek Inscriptions'].

सातवाहनः— तऱ्हाळा जि. अकोला, येथे सापडलेल्या १५०० नाण्यांवरून सातवाहन घराण्यांतील कांही अज्ञात राजांचीं नांवें मिराशी यांनी प्रसिद्ध केलीं. ('A Large Hoard

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

of Satavahan Coins') यांतील कांहीं नांवें पुराणांत उल्लेखिलेलीं होतीं. पण त्याकडे कुणाचेंच लक्ष्य नव्हतं! गतवर्षी खुद्द सातवाहन राजांचेंच नाणें सापडलें. त्यावरहि मिराशींनी लेख लिहिला आहे.

वाकाटकः—सुमारें पंधरा वर्षांपूर्वीपर्यंत या घराण्याचे पांच सहा लेखच ज्ञात होते. सध्या त्याचे पंधरा-वीस लेख उपलब्ध असून ते बहुतेक मिराशींनी संपादिले आहेत. या घराण्याच्या चार शाखा होत्या, हें मिराशींनीच दाखविलें. वाकाटकांच्या अजंठ्याच्या लेखाच्या वाचनांत डॉ. बुल्हर, पं. भगवानलाल इंद्रजी यांनी चुका केल्या आहेत. त्या दुरुस्त करण्यासाठी मिराशींनी 'Vakataka Inscription in Cave XVI at Ajanta' हा लेख लिहिला. तसेंच, 'Basim Plates of Vakataka Vindhyasakti' हाहि एक लेख त्यांनी लिहिला. या दोन लेखांवरून वाशीमला वाकाटकांची एक शाखा राज्य करीत होती, हें मत सर्व विद्वानांनी मान्य केलें आहे.

राष्ट्रकूट—वाकाटकांशीं समकालीन असें एक राष्ट्रकूट घराणें कृष्णा नदीच्या खोऱ्यांत राज्य करीत होतें, ही अगदी नवी माहिती दोन वर्षांपूर्वी मिराशी यांनी 'The Rashtrakutas of Manapura' या लेखांत मांडली. हे राष्ट्रकूट कुंतल देशावर राज्य करीत होते व कालिदासकृत 'कुन्तलेश्वर दौत्यां'तील 'कुन्तलेश्वर' हेच होत, असें मिराशी सांगतात.

कलचुरी—यांचा एक शक आश्विन शुक्ल प्रतिपदेस सुरू होतो, असें डॉ. कीलहॉर्नचें मत होतें व तेंच प्रमाणभूत मानीत असत. पण 'The Epoch of the Kalachuri Chedi Era' या लेखांत हा शकारंभ कार्तिक शुक्ल प्रतिपदेस होत असल्याचें मिराशींनी सिद्ध केलें आहे. या घराण्याविषयींची इतर पुष्कळच माहिती पूर्वी उल्लेखिलेल्या मिराशींच्या आगामी इंग्रजी ग्रंथांत आली आहे.

वरील माहितीच्या कक्षेंत मिराशींनी भवभूतीचें पद्मपूर शोधलें यासारखी माहिती येऊं शकली नाही. या लेखांत ती सर्वच कुठवर यावी? उपरोक्त त्रोटक उल्लेखांवरून देखील मिराशींच्या संशोधनानें किती विविध स्वरूपाची नवीन माहिती उजेडांत आली आहे, याची वाचकांस कांहीशी कल्पना येईल. विंटरनिट्झ, कीथप्रभृतींनी मिराशींविषयीं काढलेले गौरवोद्गार कसे सार्थ आहेत, याचीहि त्यांस साक्ष पटेल. साधारता व बिनचूकपणा हे मिराशींच्या संशोधनाचे मुख्य गुण होत. यामुळे त्यांचें संशोधन युरोपीय पंडितांच्या धर्तीचेंच केवळ नव्हे, तर तोडीचेंहि झालें आहे, असें म्हणण्यास मला बिलकूल दिक्कत वाटत नाही. !

मिराशींचे मराठींतील लेख थोडे असले, तथापि त्यांचाहि एक सुंदर संग्रह निघू शकतो. 'विदर्भ व कालिदास' ['महाराष्ट्र'] 'भवभूतींचें जन्मस्थान,' 'मेघदूतांतील रामगिरि' व 'कालिदासाचें कुन्तलेश्वर-दौत्य' ['सह्याद्रि'], 'रामगुप्ताच्या चरित्रावर नवीन प्रकाश' ['शारदाश्रम-वार्षिक'], 'रामदेवराव यादवाच्या काळचा शिलालेख' ['सरदेसाई-स्मारक-ग्रंथ']—इ. इ. लेखांचा संग्रह कुणाहि थोर लेखकास अभिमानास्पद असाच होईल.

(४)

प्राचार्य मिराशी यांचें मौलिक संशोधन लक्ष्यांत घेतां त्यांजवर मानसन्मानांची वृष्टि व्हावी, यांत नवल तें कोणतें? हिंदुस्थान सरकारनें त्यांना १९४१ मध्ये 'महामहोपाध्याय' ही पदवी दिली, हा त्यांचा सर्वोच्च गौरव होय. मॉरिस कॉलेजचे एक माजी प्राचार्य कै. केशवरावजी ताम्हन हे जाडे संस्कृत पंडित व महामहोपाध्यायच होते. हुबेहूब तीच प्रथा मिराशींनीहि पुढे चालवावी, हा योग जितका आश्चर्यकारक, तितकाच आनंददायकहि आहे. त्याच वर्षीं हैद्राबाद येथे भरलेल्या अखिल भारतीय प्राच्य-विद्या-परिषदेच्या ('All India Oriental Conference'च्या) अकराव्या अधिवेशनांत मिराशी यांस पुराण-वस्तु-संशोधन, प्राचीन लिपि-शास्त्र व नाणकशास्त्र या विभागांचे अध्यक्ष नेमण्यांत आलें होतें. १९४१ मध्येच 'भारतीय नाणक संशोधक मंडळा'ने [Numismatic Society of India ने] कलचुरी नाण्यांवरील लेखाबद्दल त्यांना 'नेल्सन राइट मेडल' देऊन गौरविलें. १९४४ च्या डिसेंबर-मध्ये मद्रास येथे भरलेल्या 'इंडियन हिस्ट्री

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कॉंग्रेस ’ च्या ‘ प्राचीन इतिहास विभाग २ ’ [इ. स. ७११ तें १२०६] या विभागाचें अध्यक्ष-पद मिराशींना देण्यांत आलें होतें. त्याच वर्षी ‘ भारतीय नाणक-संशोधक मंडळा ’ नें त्यांस आपला अध्यक्ष निवडलें.

मिराशींची कामगिरी व त्यांचा झालेला गौरव पाहतां त्यांच्या तोडीचा संशोधक महाविदर्भांत नाहीं, असें म्हटल्यास तो क्वचित अतिशयोक्ति होणार नाहीं. नागपूर विद्यापीठानें त्यांस अद्यापि ‘ डॉक्टरेट ’ कां देऊं नये, हें मला कळत नाहीं ! हा योग अजूनहि आल्यास शोभादायक असाच होणार आहे !

तीन तऱ्हा

लेखक : श्री. सुशील चट्टोपाध्याय
अनुवादक : शंकर बाळाजी शास्त्री, बी. ए.

रा. शं. बा. शास्त्री हे बहुभाषाकोविद व पट्टीचे लेखक म्हणून महाराष्ट्रांत प्रसिद्धच आहेत. स्वतंत्र व अनुवादित कथालेखन ते सारख्याच कौशल्याने करतात. त्यांनी केलेला श्री० सुशील चट्टोपाध्याय यांच्या एका छोट्या पण गोड लघुकथेचा अनुवाद येथे देण्यांत येत आहे.

स्नानगृहाच्या अगदी लगतच्या घरांत राहत असे,–एक मिस्त्री आणि त्याची बायको. उत्तरेकडच्या खिडकींतून त्यांचं तें लहानसं स्वयंपाकघर अगदी स्पष्ट दिसत असे. दिवसाच्या वेळीं मिस्त्रीची हालचाल विशेषशी कानीं येत नसे. पण मध्यरात्रीच्या सुमारास तो दारू पिऊन येई, आरडा-ओरड करी आणि बायकोला यथास्थित बडवून काढी. ह्या कार्यक्रमांत एक दिवसहि कधी व्यतिक्रम घडला नव्हता.

नकुलेश्वर कातावून आपल्या अंथरुणावर उठून बसे.–" शीः ! या साल्या दारूड्याच्या तापामुळे स्वस्थ झोप घेण्याची देखील सोय नाही ! गुडगुडी तरी तयार कर ना, बाबा ! "

मी उठून गुडगुडी तयार करूं लागे--उत्तरेकडच्या त्या खिडकीजवळच. मिस्त्रीच्या भसाड्या स्वरांत उच्चारलेले शब्द स्पष्ट ऐकूं येत, " पाहूं कोणाला घरांत लपवून ठेवलं आहेस ? मी घरीं नाहीं, असं पाहून जें मनाला येईल, तेंच तूं करशील ? आज आता तूं तरी की, मी तरी !-- " आणि ह्यानंतरच्या त्याच्या तिला बदडण्याचा शब्दहि अगदी स्पष्टपणें ऐकायला येई, आणि एवढें झालें की, मग तो अंथरूण-पांघरूण बाहेर फेकून देऊन बडबड करीत बाहेर निघून जाई..

नकुल संतापून जाई. तो म्हणे, " साला सारी रात्र वेश्येच्या घरीं घालवून आपल्या बायकोच्या सतीत्वाची परीक्षा पाहायला येतो ! चांगला चाबकाखाली सडकून काढला पाहिजे, तेव्हा होईल दुरुस्त ! " ह्यावर मी म्हणायचा, " संतापून काय करणार, नकुलदा ? स्त्रीवर पुरुषांकडून चालत आलेला हा अत्याचार तर... ... ... "

"—आता तूं आपलं शहाणपण पुरे कर !—या दारुड्याचा हा आरडा-ओरडा मी एकदा सहन करीन, पण या अशा मध्यरात्रीं तुझं आणखी हें धर्मावरचं व्याख्यान मात्र मला सहन होणार नाहीं?"

खिडकींतून पाहावें, तों मिस्त्रीची बायको बाहेर फेकलेलें आंथरुण-पांघरुण - वगैरे उचलून

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

घरांत नेत होती.

✣ ✣ ✣

इतक्या परीक्षा पास करूनहि मी आपला रिकामटेकड्यासारखा इकडे तिकडे हिंडतों, हें वहिनींना कांहीं पाहवेना. म्हणूनच, मला नाग-पाशांत पक्कें जखडून ठेवण्यासाठीं त्यांचा सारखा प्रयत्न सुरू होता. सकाळ झाली आणि चहाचा कप, हातांत घेऊन त्या माझ्या खोलींत आल्या आणि एका खुर्चीवर कशा तरी येऊन बसल्या. त्यांचें शरीर, प्रस्थाच्या दृष्टीनें, कांहींसें अवजडच होतें मी म्हणालों, "अरे! या लहान खुर्चीचा तुम्हाला बराच त्रास होतो आहे, वहिनी! उद्याच मी इथे एक दुसरी मोठी खुर्ची आणून ठेवतों."

त्या म्हणाल्या, "मी आहें आपली लठ्ठ, कबूल! पण माझे दिवस तर निभून गेलेच. आता जी नवी येईल, ती मात्र लतेसारखी असली, म्हणजे झालं. बरं, भाऊजी, तुमच्या मनांत तरी काय आहे, सांगा पाहूं?"

ही कोणत्या विषयाची सूचना आहे, तें माझ्या लक्ष्यांत आलें. मी घाबरून एकदम म्हणालों, "माझ्या मनांत तसं कांहींच नाहीं, वहिनी! फक्त मला आत्ताच्या आत्ता थोडं बाहेर जायला पाहिजे, एवढंच."

"थांबा, थांबा! इतकं घाबरण्याचं कांहीं कारण नाहीं. मी कांहीं तुम्हाला फासावर चढवण्याचा हुकूम नाहीं देत. वाटल्यास मी आपली गप्पच बसतें!—पण, तुम्हीं खरोखरीच का लग्न करायचंच नाहीं, असं नक्की ठरवलं आहे?"

"ही तुम्हा लोकांची अवस्था पाहून तरी तशी इच्छा उत्पन्न होण्याचं साहस होत नाहीं."

"कां बरं? आमच्या बाबतींत असं काय दिसलं तुम्हाला?"

"हेंच, दादांना तुम्हीं कसं जखडबंद करून ठेवलं आहे, तेंच!—असं मला तरी राहतां येणार नाहीं!—"

"खरंच! ही गोष्ट एकदा तुमच्या दादांना सांगाल?"

मी हंसून म्हणालों, "त्यांत काय आहे मोठंसं? हें ऐकून दादांनाहि वाईट वाटेल, असं नाहीं वाटत मला."

वहिनी हसूं लागल्या. त्या म्हणाल्या, "नको गड्या, थट्टा राहूं द्या. माझी मामेबहीण ती राणी तुम्हीं तर पाहिली आहे ना तिला? तशी कांहीं वाईट नाहीं मुलगी ती. सांगा तर... ..."

"पायां पडतों, वहिनी! या सकाळच्या प्रसंगीं अशा महत्त्वाच्या विषयाची चर्चा करणं बरं आहे, असं मला वाटत नाहीं."

"ठीक आहे, साधु महाराज! मीहि पाहून घेईन! माझ्या बहिणीशीं लग्न करायचं नांव काढतांच जीव घाबरतो काय? पण सांगून ठेवतें, वायकोच्या पदराला लोंबकळून तिच्या मागे मागे जात असलेले तुम्ही लवकर दिसाल. तो दिवस फार लांब नाहीं."

असें म्हणून वहिनी रागावून निघून गेल्या.

✣ ✣ ✣

खाण्यापिण्याचे हाल होतात म्हणून दादांनीं आता कलकत्त्यांतच बिऱ्हाड केलं होतं. वहिनींच्या शिरावर घर-संसाराचा भार होता आणि त्यांना सहाय्य करायला आली होती त्यांची मामे-बहिण राणी, थोडे दिवस इथे राहून कलकत्ता पाहून ती परत जाणार होती.

आजकाल सकाळच्या प्रहरीं चहा आणून द्यायला वहिनी फारशा येत नसत. त्यांच्याऐवजीं येत असे राणी. राणीचें वय असेल सोळा-सतरा, दिसायलाहि ती कांहीं वाईट नव्हती; सुंदर म्हटलें तरी चालण्यासारखें होतें.

त्या दिवशीं सकाळीं बहिणीबरोबर वहिनीहि माझ्या खोलींत आल्या. त्या म्हणाल्या, "हें पाहा, भाऊजी, माझ्या ह्या बहिणीला 'बांगला' अन् संस्कृत चांगलं येतं; पण इंग्रजींत तिची तेवढीशी गति नाहीं. अधून-मधून जर तुम्ही हिला थोडं फार समजावून सांगत जाल,--तर... ...तसा तुम्हाला फार दिवस त्रास नाहीं. ही राहणारच आहे मुळीं किती दिवस अशी इथे?--तसं झालं तर फार बरं होईल पाहा. हिला इंग्रजी शिकायची फार इच्छा आहे."—

मला वाटलें, बोलतां बोलतां त्यांच्या ओठांवर मिस्किल हास्याची एक बारीकशी लकेर चमकून गेली असावी. मीं पाहिलें, राणीचें तोंडहि लाल-लाल झालें होतें. मीं म्हटलें, "वहिनी, तुमच्या

वहिणीलाच शिकवायचं, त्यांत एवढं काय आहे? विशेष म्हणजे जेव्हा सुंदर, तरुण, ...''

''शी: !-काय हें भलतंच भाऊजी !- तुम्ही ब्रह्मचारी पुरुष ! ही असली भाषा तुमच्या तोंडीं शोभते तरी काय?—''

✥ ✥ ✥

त्या दिवसापासून रोज सकाळीं राणीला मी इंग्रजी शिकवूं लागलों. पण शिष्येचं लिहिण्या-वाचण्याकडे विशेष लक्ष्य आहे, असं मला कधीं दिसलें नाहीं.

शेवटीं एके दिवशीं मीं सांगून टाकलेंच. म्हणालों, '' असं पाहा, राणी ! लिहिण्यावाचण्याकडे तुझं विशेषसं लक्ष्य असावं असं कांही मला वाटत नाहीं.- मग उगाच हे श्रम कशाला ? ''

तीहि अगदी सरळ भावाने म्हणाली, ''मलाहि नाहीं आवडत हें. त्यापेक्षा, तुम्ही एखादी गोष्ट सांगा ना ? मला गोष्टी ऐकायला भारी आवडतात ''

आता काय बोलावें ?-अंहं ! प्रकरण कांही सोपें नाहीं मी म्हणालों, '' जर शिकण्याकडे तुझं मन लागत नसेल, तर मग नुसत्या गोष्टी सांगण्यांत अन् ऐकण्यांत वेळ व्यर्थ नष्ट करण्यांत काय फायदा ? ''

ती म्हणाली, '' जर तुम्हाला त्रास वाटत असेल, तर मी येणार नाहीं आता. ''

'' नाहीं, नाही !-मी माझ्या त्रासाबद्दल नाहीं बोलत भलताच गैरसमज करून घेऊं नकोस. तूं येत जा. जेव्हा इच्छेला येईल, तेव्हा येत जा. दुसरं कांही नाहीं, तर गोष्टीच !-खरं की नाहीं?-''

✥ ✥ ✥

नाटक पाहून आलों; आता इतक्या रात्रीं घरीं जाण्यापेक्षा नकुलदाच्या वसतिगृहांतच उरलेली रात्र काढावी, असें मीं ठरवलें. उत्तरेकडच्या खिडकीशीं बसून मी नकुलदासाठी गुडगुडी तयार करूं लागलों. मिस्त्रीच्या घरांत अगदी सामसूम होती. मीं विचारलें, '' का नकुलदा, तुमचा मिस्त्री घर सोडून दुसरीकडे गेला की काय ? आज अगदी शांत दिसतं आहे सारं ? हीच तर त्याची घरीं परत यायची वेळ...... ''

'' अरे, ती एक मजाच झाली, बाबा. तुला सांगितलंच नाही अजून. एके दिवशीं काय झालं, मिस्त्री आपला नेहमीसारखा रात्रीं आला अन् लागला शिवीगाळ करायला. इकडे मिस्त्रीची बायकोहि हातांत एक जळकं लाकूड घेऊन रण-रागिणीचा अवतार धारण करून त्याच्यासमोर येऊन उभी राहिली, अन् म्हणाली, हें पाहा मिस्त्री. आज कांही कमी अधिक केलं तर लक्ष्यांत ठेव.आज एक तूं तरी नाहीं तर मी तरी ! रात्रंदिवस वेश्येच्या घरीं पडून असतोस अन् माझ्यावर मोठा हुकूम करतोस ? शरम नाहीं वाटत ? आत्ताच्या आत्ता घराबाहेर चालता नाहीं झालास, तर तुझं डोकं फोडून टाकीन, सांगून ठेवतें ! —

'' —मिस्त्री एकदम गप्प !- घाबरून पांच-दहा पावलं मागे जाऊन तो म्हणाला, -ठीक आहे, पाहतों आता उद्यापासून तुला खायला कोण देतं तें !— ''

'' दोन तुकडे भाकरीसाठी मला विकत घेऊन ठेवलं आहेस तूं ?—माझं पानाचं दुकान नीट राहिलं, तर तुझ्यासारखे तीन गुलाम मी पाळूं शकतें, समजलास ! नीघ इथून, चालता हो. तुझं हें काळं तोंड मला आणखी दाखवूं नकोस ! पुन्हा ह्या घरांत पाय तर ठेव; तुझं डोकं फोडीन तेव्हाच राहीन !— ''

'' झालं, बाबा. मिस्त्री गुपचुप पसार ! त्या दिवसापासून रात्रीचा गोंधळ संपला ! मलाहि निवांत झोप मिळते. ''

मी म्हणालों, '' पाहिलं नकुलदा ! पोटाला खायला अन्न देतो, म्हणून काय माणूस... ''

'' बाबा, उद्या ऑलबर्ट हॉलमध्ये जा अन् पोटभर व्याख्यान झोडून ये.—आता तेवढी गुडगुडी आण पाहूं अगोदर !— ''

✥ ✥ ✥

त्या दिवशीं घरात एकच गडबड उडून गेली होती. कोणती साडी नेसावी, कोणत्या साडीला कोणता ब्लाऊज ' मॅच ' होतो, अशा-सारख्या गंभीर प्रश्नांचा विचार करून करून वहिनींचें डोकें अगदी शिणलें होतें. ह्या साऱ्या गोंधळाचें मूळ,-आज सिनेमा पाहायला जायचें ठरलें होतें. मी म्हणालों, '' ...हं. चांगला नीट थाट-माट होऊन जाऊं द्या, वहिनी ! तुमच्या वहिणीच्याहि नट्टापट्ट्यांत कांही उणीव राहूं देऊं

नका. कोणी मित्र वगैरे भेटलाच, तर त्याच्या मनांत माझ्यावद्दल ईर्षा उत्पन्न झाली पाहिजे !– ”

“ कां वरं ?–थाटमाट न करतां आम्ही इतक्या कुरूप दिसतों वाटतं ? ”

“ अरे !–हें पाहा आता ! माझ्या बोलण्याचा भलताच अर्थ कां करतां, वहिनी ? हीच तर तुमची मोठी खोड आहे बघा. पण तें राहूं द्या. वहिनी, ह्या आपल्या समोरच्या घरांत मानगड तरी काय आहे ? आंत राहणाऱ्या माणसांचा कधी एक शब्द तरी कानांवर येईल तर शपथ ; अन् रोज दुपारच्या वेळीं पाहावं, तर दाराला आपलं भलं थोरलं कुलुप ! नवरा–बायको दोघेहि ऑफिसांत जातात की काय ? ”

“ अरे, बाबा, नका काढूं तो विषय ! इथे राहतात एक बाबू अन् त्यांची दुसरपणची बायको. गृहस्थ तसा सर्व दृष्टींनी चांगला आहे; फक्त एकच दोष आहे त्याच्यांत.–बाहेर जाते वेळीं बायकोला कुलपबंद करून मग स्वारी बाहेर जाते !–तसं पाहिलं तर बायकोवर मायाहि त्यांची फार आहे ! पण असल्या मायेला काय जाळायची का आहे ?–माझ्यासारखी असती, तर .....”

“ काय केलं असतं, वहिनी ? ”

“ –काय केलं असतं ?–जाऊं द्या. तें बोलून काय उपयोग ?–बायको बिचारी दुपारीं आंत वसून रडत असते. त्या दिवशीं सकाळीं मी त्यांच्याकडे बसायला गेलें होतें.–काय तें तिचं बिचारीचं रडणं ! माझ्या तर जिवाचं पाणी झालं !–

“ हं–तिच्या जागीं तुम्ही जरी असतां ना, तरी तिच्यासारखं दुःख तुम्हाला देखील झालं असतं, एवढंच. यापेक्षा निराळं असं कांहीच झालं नसतं दुसरं. दादाला तुम्हीं मुठींत आणून ठेवलं आहे ना, म्हणूनच मोठ्या जोराच्या गोष्टी बोलूं शकतां आहांत ! मी असतों, तर… …”

राणी मध्येच म्हणाली, “ तुम्ही तर प्रत्येकच बाबतींत उलटं धरूनच चालतां.–कां वरं ? एकाचं असं झालं, म्हणजे काय प्रत्येकाचंहि तसंच झालं पाहिजे, असा कांही नियम आहे की काय ? ”

मी हंसून म्हणालों, “त्याबद्दल नाहीं मी बोलत ! पण जर तसं झालं असतं, तर काय झालं असतं याबद्दल मी बोलतों आहें.–पण तुला त्या बाबतींत भिण्याचं कांही कारण नाही. किती झालं, तरी वहिनींची वहीण तूं ! मुठींत करून घ्यायचा मंत्र तुम्हा लोकांना चांगला पाठ आहे !–”

वहिनी तोंड वळवून किंचित् हसल्यासारखें करून म्हणाल्या, “–पण, मला नाही वाटत, त्या मंत्राची मात्रा प्रत्येकावर लागू पडूं शकते, असं. ”

मी म्हणालों, “–पडेल वहिनी, जरूर पडेल ! माणूस थोडा अधिक प्रमाणांत जंगली असला, म्हणजे त्याला मुठींत आणायला थोडा अधिक उशीर लागतो, एवढंच. खरं की नाहीं, राणी ? ”

राणीने हसून मान खाली वळविली. तिचे गाल आरक्त झाले होते.

◆ ◆ ◆

वहिनी म्हणाल्या, “–तर मग, भाऊजी, मामांकडे मी पत्र लिहून कळवतें.—आपसांतलंच सारं आहे, खरं ! पण किती झालं तरी साऱ्या गोष्टी एकदा नक्की ठरल्या पाहिजेत, रीतसर. खरं कां नाही ? ”

मी जसा कांही आकाशांतून खाली कोसळलों. म्हणालों, “ कां वरं ?”

“अजूनहि तुमचं आपलं आहेच, –‘कां वरं ?’ तुम्ही लग्न करणार नाही ?”

“लग्न ? — लग्न करून काय होईल ?”

“कांही तरीच बोलूं नका, भाऊजी ! हें आता तुमच्या वयाला पंचविसावं उलटायला आलं, लग्न करून काय होईल तें आता तुम्हाला समजावून सांगण्याची गरज नाही, हें मला ठाऊक आहे. थट्टा नाही, भाऊजी, तुम्ही अगदी खरं सांगा पाहूं, —राणी तुम्हाला पसंत आहे की नाही ?”

“पसंत-नापसंतचा प्रश्न नाही. लग्न करायचीच सध्या माझी इच्छा नाही.”

एक मोठा उसासा सोडून वहिनी म्हणाल्या, “इतक्या दिवसांनंतरहि तुम्ही असेच बोलाल, अशी जर मला कल्पना असती, तर मीं राणीला इथे आणलंच नसतं ! आता तिचं पुढे कसं होणार हाच विचार आहे !—”

शंकित भावाने मीं विचारलें, “कां वरं ? तिला काय झालं ?”

“काय व्हायचं आणखी ? बायकांचा जीव तुमच्यासारखा कठोर असतो थोडाच ! जें व्हायचं

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तेंच झालं!"

मी हसून म्हणालों, "हंऽऽ!--प्रेमाबद्दल बोलतां आहांत, वहिनी?—दुसरीकडे कुठे लग्नाचं जुळतांच चट्कन तो रोग एका मिनिटांत बरा होऊन जाईल बघा! त्याचं कांही मोठंसं नाही. पण, वहिनी, खरी गोष्ट तुमच्याजवळ कबूल करायला मला लाज वाटत नाही. माझ्या मनाचा निर्धारच आताशा दुबळा व्हायला लागला आहे. मला सात दिवस आणखी द्या. त्या अवधींत मी माझं निश्चित उत्तर तुम्हाला सांगतों!-"

"चिरंजीव व्हा, भाऊजी! माझा तुम्हाला आशीर्वाद आहे. मी तर मामीला वचन देऊन आलें होतें. जर हें लग्न जुळलं नसतं, तर पुन्हा मला तोंड दाखवायला जागा नव्हती पाहा! राणी माझी बहिण असून तुमच्यासारख्याला आपल्या मुठींत आणूं शकणार नाही, ही गोष्ट कधी माझ्या स्वप्नांतहि आली नाही!"

"बोला, वहिनी, तुम्हाला काय वाटेल तें!- हात-पाय बांधून मारायचं ठरवलं, तर काय करायचं?"

❖ ❖ ❖

असाच एके दिवशीं हिंडतां हिंडतां न कुळदाच्या त्या जुन्या वसतिगृहांत जाऊन पोहोचलों. उत्तरेकडच्या खिडकीशीं सहजच आपला जाऊन उभा राहिलों, तों एक गंमतीचं दृश्य पाहायला सापडलें. मिस्त्री स्वतः चुलीशीं बसून स्वयंपाक करीत होता-आणि मिस्त्रीची बायको दरवाज्यांत पंख्याने वारा घेत बसली होती!--पाहून मला हसूं आलें.

❖ ❖ ❖

पण घरीं परत आल्यानंतर पाहिलें,--समोरच्या घराच्या दारांत एकाच्या ऐवजीं दोन कुलुपें पडलीं होतीं!

❖ ❖ ❖

आज मार्चची पांचवी तारीख. आज राणीचं माझं लग्न!-- सायंकाळीं गोरज मुहूर्तावर!

हिन्दुस्तानीची नीति

लेखक : काकासाहेब कालेलकर.
अनुवादक : श्रीपाद जोशी

> हिंदुस्थानची राष्ट्रभाषा ही सोपी हिंदी व सोपी उर्दू यांच्या मिश्रणाने बनणार आणि ती नागरी व उर्दू या दोन्ही लिपींत लिहिली जाणार, हा मुद्दा रा. कालेलकर यांनी या लेखांत मांडला आहे. उर्दू शब्द व लिपी यांच्यावर बहिष्कार घालून निभण्याजोगें नाही, हें आपण जितक्या लौकर उमगूं, तितकें चांगलें.

इंग्रजीच्या द्वारें या देशांत पाश्चिमात्य विद्येचें शिक्षण सुरू झालें. त्यायोगें आपल्या देशांतील भाषांमध्ये कांहींशी नवीन जागृति आली. प्रांताप्रान्तांतील भाषांचें साहित्य अनेक दिशांनी वाढलें आणि विकसित झालें, यांतहि शंका नाही. परन्तु देशाच्या राजव्यवहारांत, व्यापारांत आणि शिक्षणाचें माध्यम म्हणून इंग्रजी भाषा चालूं लागल्यामुळे देशांतील सगळ्या भाषा अपमानित झाल्या आहेत. भाषेचें साहित्य वाढणें निराळें आणि राष्ट्राच्या जीवनव्यवहारांत स्वदेशी भाषांची प्रतिष्ठापना होणें निराळें. साहित्य वाढल्याने भाषा पुष्ट होईल. परंतु जेव्हा लोकव्यवहारांत भाषेचीच प्रतिष्ठा होते,

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तेव्हा तिच्यांत चैतन्य, प्राण किंवा जीव येतो. पुष्ट दासींचें जीवन भाषेचें तेज वाढविणार नाही. देशी भाषांना त्यांच्या त्यांच्या क्षेत्रांत राणीचें स्थान मिळालें पाहिजे.

इंग्रजीनें येथे येऊन राजभाषेचें आणि राष्ट्रभाषेचें स्थान हिरावून घेतलें, एवढेंच नव्हे, तर प्रान्तीय भाषांचेंहि पुष्कळसें क्षेत्र इंग्रजीनें गडप केलें आहे.

म्हणून जेव्हा आपण लोकव्यवहारांतून इंग्रजीला हुसकून लावूं, तेव्हा जेथून जेथून आपण इंग्रजीला हाकलून लावलें आहे, तेथे तेथे राष्ट्रभाषा हिंदुस्तानीला स्थान दिलेंच पाहिजे, असें मुळींच नाही. यापुढे या देशांत जें राज्य चालेल, तें जनतेसाठीच असेल. राज्य कसें चालतें, राज्यांत काय चाललें आहे-वगैरे सर्व गोष्टी लोकांना त्यांच्या स्वतःच्या भाषेंत समजल्या पाहिजेत.

म्हणून आमच्या देशाचा सर्व व्यवहार शक्य तोंवर प्रत्येक प्रान्ताच्या प्रान्तीय भाषेंतच चालला पाहिजे. जे कायदे बनविले जातील, ते लोकांच्या प्रान्तीय भाषांतूनच प्रकाशित झाले पाहिजेत. कोर्टकचेऱ्यांचीं कामेंहि लोकांना समजतील अशा प्रान्तीय भाषांतूनच चाललीं पाहिजेत. शिक्षणाचें काम प्रथमपासून शेवटपर्यंत प्रान्तीय भाषेंतच चाललें पाहिजे. पोस्ट आणि तार खात्याचें कामहि शक्य तोंवर प्रान्तीय भाषेंत चाललें पाहिजे.

अशा प्रकारें प्रान्तीय भाषांना त्यांच्या स्वतःच्या क्षेत्रांत पुरेपूर स्थान दिल्यानंतर सबंध हिंदुस्थानचें जें काम असेल, अथवा प्रान्ताप्रान्तांत जो व्यवहार चालेल, त्यासाठी राष्ट्रभाषा हिंदुस्तानीचा उपयोग केला जाईल.

मुसलमानी धर्मांतील ज्या खास खास गोष्टी विद्वान् लोकांना अरबी व फारसी यांतून मिळतात, त्या सर्व आम लोकांना त्यांच्या त्यांच्या प्रान्तीय भाषांतून मिळाल्या पाहिजेत. हिन्दुधर्मांतील ज्या गोष्टी संस्कृत, पाली किंवा अर्धमागधी यांत भरलेल्या आहेत, त्या सर्व लोकांना प्रान्तीय भाषांतून सुलभतेने मिळाल्या पाहिजेत.

याशिवाय जर इस्लामी धर्मांतील सर्व गोष्टी लोकांना देण्याचें काम उर्दू भाषा करील, आणि हिंदुधर्मांतील गोष्टी लोकांना हिन्दी भाषेमार्फत मिळतील, तरी कांही वाईट नाही. परन्तु अशी उर्दू किंवा अशी हिन्दी ही राष्ट्रभाषा समजली जाणार नाही.

राष्ट्रभाषा ही सोपी हिन्दी व सोपी उर्दू यांच्या मिश्रणाने बनलेली हिन्दुस्तानीच असेल. ही हिंदुस्तानी हिन्दुस्थानच्या संमिश्र संस्कृतीची वाहक असेल. हिदुस्तानी ही कांही फक्त हिन्दु संस्कृतीसाठीहि नाही, किंवा फक्त इस्लामी संस्कृतीसाठीहि नाही. ती दोहोंसाठी आहे. ती साऱ्या हिंदुस्थानांतील शहरांत व खेड्यांत राहणाऱ्या लोकांचें दररोजचें संपूर्ण जीवन व्यक्त करणारी व्यापक भाषा असेल.

आज हिन्दुस्तानीची व्याख्या अशी आहेः—

"उत्तर हिस्थानांतील शहरांत व खेड्यांत राहणारे हिन्दु, मुसलमान वगैरे सर्व लोक जी भाषा आपसांतील व्यवहारांत वापरतात आणि ज्या भाषेचें साहित्यिक रूप हिन्दी आणि उर्दू या दोन प्रवाहांनी वाहतें आणि जी भाषा नागरी व उर्दू लिपींत लिहिली जाते, ती हिन्दुस्तानी. आज ती सोपी हिन्दी व सोपी उर्दू यांच्या मिश्रणाने बनेल. परन्तु इंग्रजीला हाकलून लावल्यानंतर जेव्हा हिन्दुस्तानी सर्व प्रकारच्या व्यवहारांत उपयोजली जाईल, तेव्हा ती आपोआप मजबूत बनेल, समृद्ध बनेल आणि आपल्या पद्धतीने अनेक दिशांनी विकसित होईल."

ज्याप्रमाणे एखाद्या मोठ्या वृक्षाला अनेक शाखा फुटतात, त्याचप्रमाणे ही हिंदुस्तानी विकसित होत जाईल. अशा प्रकारच्या स्वाभाविक विकासाचें अभिनंदन करून हिन्दुस्तानीची एकता (Standard) कायम ठेवण्यासाठी मोठ्या काळजीपूर्वक प्रयत्न करावा लागेल.

असा एक काळ होता की, जेव्हा अशा प्रकारच्या मिश्र शैलीच्या हिन्दुस्तानींत बरें वाईट लोकप्रिय साहित्य मिळत असे. आज त्याचे हिन्दी आणि उर्दू असे दोन भाग झाले आहेत. असे दोन भाग पडण्याचें कारण स्वाभाविक होतें.

आपल्या देशांत इंग्रजी शिक्षणाचा प्रारंभ झाला तेव्हापासून आतापर्यंत प्रान्तीय भाषांचें शिक्षण प्राथमिक इयत्तांपर्यंतच मर्यादित होतें. त्यानंतर सगळें शिक्षण होतां होईल तितक्या लौकर इंग्रजीच्या मार्फतच होऊं लागलें आणि दुय्यम भाषा म्हणून लोक संस्कृत किंवा फारसी भाषा घेऊं लागले.

याचा परिणाम असा झाला की, जेव्हा सुशिक्षित

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लोक देशी भाषेंत लिहूं लागले, तेव्हा ते विचार करूं लागले इंग्रजींत आणि देशीभाषेचें नीटसें ज्ञान नसल्यामुळे नवीन नवीन शब्द बनवूं लागले संस्कृतमधून किंवा अरबी-फारसीमधून. अशा प्रकारें आमच्या सर्व प्रान्तीय भाषा लोकांपासून कांहीशा दूर दूर जाऊं लागल्या. प्रान्तीय भाषांची शैली इंग्रजी पद्धतीची असल्यामुळे आणि नवीन नवीन शब्द संस्कृतमधून बनविले जाऊं लागल्यामुळे भाषा कृत्रिम बनल्या, परन्तु उर्दू आणि सिन्धी खेरीजकरून बाकी सर्व देशी भाषांमध्ये एक प्रकारची कृत्रिम एकताहि वाढली.

बंगाली, मराठी, गुजराती वगैरे भाषांनी ज्या प्रकारचा विकास केला, त्याच प्रकारचा विकास हिन्दीनेहि केला.

इकडे उर्दूने अरबी-फारसीचे शब्द वाढवीत वाढवीत स्वतःला खूप कठीण बनवून घेतलें. यामुळे अशिक्षित हिन्दु-मुसलमानांना उर्दू भाषा ही अत्यंत अवघड वाटूं लागली.

परन्तु अशा भाषा यापुढे चालणार नाहीत. लोकांना स्वराज्य जेव्हा मिळावयाचें असेल तेव्हा मिळो, परन्तु लोकांना 'व्होट' (मत) मात्र मिळून चुकलें आहे. आता हळू हळू सगळी सत्ता जनतेच्या हातीं जात आहे. यामुळे लोकांना प्रत्येक गोष्ट समजावून देऊन त्यांचें मत मिळवावें लागतें. जेव्हा लोकशाहीचे, जनतंत्राचे दिवस येतात, तेव्हा भाषा सोपी बनतच असते. जो लोकसेवक लोकांच्या भाषेमार्फत लोकांच्या कानांपर्यंत पोहोचेल, त्याच्याच हातीं अधिकार येईल. राज्य चालविण्याची संधि त्यालाच मिळेल.

अशा स्थितींत आमची हिन्दुस्तानी आणि तिचें साहित्य हीं आपोआप सोपीं बनत जातील. याचें सर्वोत्कृष्ट उदाहरण म्हणजे सिनेमाची हिन्दुस्तानी.

आज आपल्यासमोर हिन्दुस्तानीचे दोन नमुने आहेत. एक आहे रेडियोची हिन्दुस्तानी आणि दुसरी आहे सिनेमाची हिन्दुस्तानी. रेडियोची हिन्दुस्तानी राजमान्य आहे, तर सिनेमाची हिन्दुस्तानी लोकमान्य आहे. रेडियोची हिन्दुस्तानी ही इंग्रज सरकारने आमच्यावर लादलेली भाषा आहे; ती आमच्यांत आपसांत कलागती लावून देणारी हिन्दुस्तानी आहे. सिनेमाची हिन्दुस्तानी सर्वसामान्य जनतेला खूष करण्यासाठी लिहिली जाते. हिन्दु-मुसलमान वगैरे सर्व जमातींचे लोक ती भाषा पसन्त करतात. [जर लोकांमध्ये भाषेच्या बाबतींतहि जातीयता वाटेल, तर सिनेमाची हिन्दुस्तानीहि बिघडेल.] काँग्रेसच्या बतीने जीं भाषणें होतात, तीं सर्व हिन्दुस्तानींत होतात. त्यांत हिन्दी आणि उर्दू यांचें मिश्रण असतें. परन्तु प्रत्येक वक्ता आपल्या शक्तीप्रमाणे हें मिश्रण बनवीत असतो. प्रत्येकजण आपली भाषा सोपी बनविण्याचा प्रयत्न करीत असतो, ही आनन्दाची गोष्ट आहे. याच प्रयत्नांतून आदर्श हिन्दुस्तानी तयार होईल.

आज आम्ही देशांतील शिक्षणक्रमांत तीन वर्षेपर्यंत विद्यार्थ्यांना राष्ट्र-भाषा हिन्दुस्तानी शिकवूं. नंतर प्रत्येक व्यक्तीला जशी संधि मिळेल, तशी ती आपली हिन्दुस्तानी वाढवील. उच्च शिक्षणासाठी प्रान्तीय भाषेचा उपयोग होऊं लागल्यामुळे प्रत्येक प्रान्तीय भाषा आपापल्या पद्धतीने शास्त्रीय परिभाषा तयार करील. प्रान्तीय भाषा आपल्या या परिभाषा एकमेकींच्या पाहून तयार करतील. यामुळे त्यांच्यांत कांही ना कांही साम्य हें राहणारच.

राष्ट्रभाषा हिन्दुस्तानीसाठी जी परिभाषा तातडतोब हवी आहे, ती रसायनशास्त्र किंवा पदार्थविज्ञान या विषयांची नसून राजकारण, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, व्याकरण आणि साहित्यशास्त्र या विषयांची हवी आहे त्या विषयांत कांही मर्यादेपर्यंत खिचडी (भेसळ) असलेली परिभाषा चालूं शकेल. परन्तु नन्तर मात्र आपल्याला संस्कृतपासून बनलेली एक आणि अरबीपासून बनलेली एक अशा दोन वेगवेगळ्या परिभाषा तयार कराव्या लागतील. प्रत्येक सुशिक्षित व्यक्तीला या दोन्ही प्रकारच्या परिभाषा आल्या पाहिजेत. अर्थात् त्यांपैकी त्याला जी सोयीची वाटेल, तिचाच तो प्रत्यक्ष उपयोग करीत राहील, हेंहि तितकेंच खरें आहे. अशा प्रकारचे पारिभाषिक शब्द हजार दोन हजारांहून जास्त असत नाहीत. यामुळे दोन्ही प्रकारचे पारिभाषिक शब्द लक्ष्यांत ठेवणें कांही फारसें अवघड नाही उदाहरणार्थ, 'पुल्लिंग' व 'स्त्रीलिंग' या शब्दांबरोबर 'मुज़क्कर' व 'मुअन्नस' हे शब्दहि लक्ष्यांत ठेवले, म्हणजे झालें.

शास्त्रीय परिभाषा देण्याची शक्ति सर्व भाषांत

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

एकसारखी असत नाही. संस्कृत, अरबी आणि ग्रीक या भाषांत परिभाषा बनविण्याची शक्ति सर्वांत अधिक आहे. लॅटिन आणि पर्शियन यांच्यापासूनहि परिभाषा बनते. परन्तु या भाषांची भेसळ करून एकजिनसी परिभाषा बनविणें कांही सोपें नाही.

हिन्दुस्तानीने परिभाषेच्या भानगडींत निदान आज तरी पडूं नये. कांही वर्षांनंतर जेव्हा हिन्दुस्तानीची शक्ति वाढेल आणि साम्प्रदायिक-जातीय-कटुता कमी होईल, तेव्हा कदाचित् हिन्दुस्तानींत परिभाषा बनूं शकेल. तोंपर्यंत प्रान्तीय भाषांनी आपली आपली परिभाषा स्वतंत्रपणें बनवावी हेंच शहाणपणाचें होय.

पाश्चिमात्यांकडून उच्च विज्ञान घेण्याचा-शिकण्याचा-जोंपर्यंत प्रश्न आहे, तोंपर्यंत आपल्याला शिष्यभावनेने त्यांचीच परिभाषा घ्यावी लागेल. तेंच विज्ञान जेव्हा आपल्याला आपल्या लोकांना वाढावें लागेल तेव्हा आपण तें प्रान्तीय परिभाषेंतच वाढूं. जनतेपुढे परदेशी परिभाषेंत तें ज्ञान ठेवणें म्हणजे तिच्यावर अत्याचार करण्यासारखें आहे. आपली स्वदेशी परिभाषा अशी असली पाहिजे की, तिचा प्रत्येक शब्द कांही ना कांही बोध देणारा, जनतेच्या ज्ञानांत भर घालणारा असावा.

आता उरला लिपीचा प्रश्न. हा प्रश्न सर्वांत गुंतागुंतीचा आहे, असें समजलें जातें. तसें पाहिल्यास लिपि ही चीज आहे तरी काय ? ध्वनि व्यक्त करण्याची ती एक नुसती संज्ञा आहे. भाषेमध्ये जे जे ध्वनि प्रयुक्त होतात, त्यांना योग्य प्रकारें व्यक्त करण्यासाठी जें कांही अनुकूल साधन मिळेल तें घेऊन आपण पुढे चालूं शकतों. परन्तु लिपींना त्यांचा स्वतःचा असा इतिहास असतो. लोक आपला स्वभाव आणि अभ्यास सहजासहजीं सोडूं शकत नाहीत. देवनागरी, गुरुमुखी यांसारख्या लिपींविषयीं लोकांच्या मनांत एक पवित्र भावनाहि निर्माण झालेली आहे. या पवित्र भावनेमुळे त्यांचे भक्त त्यांचा त्याग करावयाला तयार होत नाहीत. आणि, हीच पवित्र धार्मिक भावना आड आल्यामुळे इतर लोक या लिपींचा स्वीकार करूं शकत नाहीत. असें कांही मुसलमान लोक आहेत की, जे उर्दूच्या ऐवजीं इंग्रजी (रोमन) किंवा दुसरी कोणतीहि लिपि स्वीकारण्यास तयार होतील. परन्तु देवनागरी लिपि ही हिन्दूंची धर्मलिपि समजली जाते, याच एका कारणामुळे ते स्वीकार करणार नाहीत. 'देवनागरी' ही जर फक्त 'नागरी' असती, तर तिचा स्वीकार करण्यास त्यांना कसलीच हरकत वाटली नसती.

हिन्दुस्थानची संस्कृति आणि येथील भाषांचें वैशिष्ट्य पाहिल्यास हिन्दुस्थानांतील बहुतेक सर्व भाषा संस्कृत परिवारांतील आहेत, हें कोणाच्याहि ध्यानांत येईल. सर्व भाषांसाठी नागरी लिपि (कांही सुधारणा करून) उपयोगी पडूं शकेल. जर सर्व प्रांतीय भाषांनी सुधारलेल्या नागरी लिपींचा स्वीकार केला असता, तर राष्ट्रलिपीचा प्रश्न अगदी सहजासहजीं सुटला असता. आपण नवी लिपि शिकण्यास तयार होतों, परन्तु आपली स्वतःची लिपि सोडण्यास तयार होत नाही. हिन्दी व मराठी-प्रमाणे गुजराती, बंगाली, पंजाबी, असमिया, उडिया आणि सिन्धी इतक्या भाषा नागरी लिपीचा उपयोग करूं लागतील, तर लिपीचा प्रश्न पुष्कळच सोपा होईल. दक्षिणेच्या कन्नड, तेलुगु, आणि मल्याळम् यांतील भाषा जर नागरीचा स्वीकार करतील, तर भारताचा लिपीचा प्रश्न सुटण्यास फार वेळ लागणार नाही जर त्यांच्याने इतकें होत नसेल, तर त्या तीन्ही भाषांनी आपल्यासाठी कन्नडसारखी कोणती तरी एक लिपि समान भावनेने चालवावी. असें झाल्यास पुष्कळच प्रगति होईल.

तामिल भाषेची स्थिति कांहीशी निराळी आहे. परन्तु तेथेहि नागरी लिपि चालवितां येईल. किंवा दक्षिणेच्या चार भाषांसाठी एकच द्रविडी लिपि चालविली गेल्यास सोळा लिपींच्या प्रश्नाऐवजीं नागरी, उर्दू व द्रविडी या तीन लिपि चालवून हिन्दुस्तानचा प्रश्न सोडवितां येईल. पण हें करणार कोण ?

आज आपल्यापुढे दोन मुख्य प्रश्न आहेतः— नागरींत कशा व किती सुधारणा कराव्यात आणि राष्ट्रभाषेची लिपि कोणती असावी?

आज राष्ट्रभाषा नागरी व उर्दू या दोन लिपींत लिहिली जाते. राष्ट्रभाषेसाठी या दोन्ही लिपींना बाजूस सारून रोमन लिपि चालवावी, अशीहि सूचना केली जात आहे. तेव्हा आपल्याला या तीन लिपींचा विचार करावयाचा आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

राष्ट्रभाषेसाठी फक्त उर्दू लिपिच चालवावी असा आग्रह बाळगण्याची हिम्मत कोणी करणार नाही. उर्दू लिपि हिन्दुस्तानांतील भाषांच्या दृष्टीने अपूर्ण आहे. येथील भाषांतील सर्व ध्वनि तिच्या द्वारें व्यक्त होऊं शकत नाहीत. उर्दू लिपि ही मरमर लिहिली जाते व पंजाब, संयुक्तप्रांत वगैरे भागांत तिचें प्रचलन आहे, या दोन गोष्टी सोडल्यास उर्दूच्या बाजूने मांडण्यासारखा एकहि महत्त्वाचा मुद्दा नाही. उर्दूचें म्हणणें ऐवढेंच की, ' मी आहें. माझा नाश केला जाऊं नये ! '

खरा झगडा देवनागरी आणि रोमन यांच्यांत आहे. येथे देखील सर्वांत चांगली लिपि कोणती हें आपल्याला ठरवावयाचें नाही. भारतीय भाषांची ध्वनिव्यवस्था शास्त्रीय आहे, यांत शंका नाही. नागरी, गुजराती, बंगाली, उडिया, शारदा, कन्नड, तेलुगु, मल्याळम्, या सर्व लिपींची ध्वनिव्यवस्था एकसारखी आहे. यामुळे आपण असें म्हणूं शकतों की, या सर्व लिपि शास्त्रीय आहेत. या लिपींमध्ये हिन्दी, मराठी व संस्कृत या भाषांमुळे नागरी लिपीचें प्रचलन सर्वांत अधिक आहे. परन्तु एवढ्यावरून या सर्व लिपींत नागरी लिपि जास्त शास्त्रीय आहे, असें मात्र म्हणतां येणार नाही. नागरी लिपि लिहिण्यास वेगवान् नाही किंवा इटॅलिकप्रमाणे प्रवाहीहि नाही. रोमन लिपींत थोड्या फार सुधारणा केल्यास ती नागरीच्या सर्व गरजा भागवूं शकेल. तिचा अक्षरक्रम बदलून नागरीप्रमाणे शुद्ध करतां येईल. अशा प्रकारें निव्वळ शास्त्रीय दृष्टीने पाहिल्यास इंडोरोमन (Indo Roman) लिपीचा पक्ष सर्वांत प्रबळ आहे. [इंडोरोमन म्हणजे हिन्दुस्तानच्या दृष्टीने सुधारलेली आणि नव्या क्रमाने रचलेली रोमन लिपि. हिला लोक इंग्रजी लिपि असेंहि म्हणतात.]

परन्तु आपल्याला कोणत्याहि लिपीचें शास्त्रीयत्व सिद्ध करावयाचें नाही. आज काय होऊं शकेल, एवढेंच पाहावयाचें आहे.

रोमन लिपि आणल्यास नागरीवाले नागरी लिपि सोडणार नाहीत आणि उर्दूवाले उर्दू लिपिहि सोडणार नाहीत. यामुळे दोनाच्या जागीं तीन लिपींच्या झगडा सुरू होईल आणि आमची प्रगति खुंटेल.

उर्दू लिपीच्या भीतीने नागरीचा त्याग करणें आणि रोमन लिपीचा स्वीकार करणें हें आत्मरक्षणासाठी आत्महत्त्या करण्यासारखें आहे. [Committing suicide in selfdefence] नागरीच्या भीतीने उर्दूहि आत्महत्त्या करून रोमन आणण्याचा विचार करूं शकेल.

आता रोमन आणि नागरी यांच्या झगड्यांत नागरीने उर्दूशीं शत्रुत्व न पत्करतां तिच्याशीं तडजोड करून, म्हणजे तिचा स्वीकार करून, पुढे पाऊल टाकलें पाहिजे. कोणीं कांहीहि म्हटलें, तरी उर्दू लिपि ही नागरीला मागे पाडून तिचें स्थान घेऊं शकणार नाही. नागरी लिपि या देशांतील लिपि आहे; येथील सर्व भाषांना अनुकूल आहे. या देशांत नागरीचीं मुळें इतकीं खोल गेलीं आहेत की, तिचा नायनाट करणें कुणालाहि शक्य नाही. उर्दूच्या प्रचलनामुळे नागरीला भिण्याचें कांहीच कारण नाही. आज जें निजामाच्या राज्यांत होत आहे, तें सबंध हिन्दुस्थानभर होऊं शकणार नाही. याच्या उलट सबंध हिन्दुस्तानांत हिन्दुस्तानीसाठी नागरी आणि उर्दू या दोन्ही लिपींचा स्वीकार झाल्यास निजामालाहि आपल्या राज्यांत तीच गोष्ट सुरू करावी लागेल.

राष्ट्रभाषा हिन्दुस्तानी ही दोन लिपींत लिहिली जाते, ही गोष्ट आपल्याला कबूल करावीच लागेल. पंजाबमधील हिन्दु आणि मुसलमान दोघेहि उर्दूचाच उपयोग करतात. हिन्दुस्तानीचें साहित्य नागरींतहि आटळतें आणि उर्दूंतहि आटळतें. अशा स्थितींत दोहोंपैकी फक्त एकच लिपि शिकण्याने निव्वळ हिन्दीचें किंवा निव्वळ उर्दूचें संघटण होईल व दुसऱ्या लिपींतील साहित्याविषयीं आपण अंधारांत राहूं. याच गोष्टीला मी राष्ट्रभाषेचा अर्धांगवायु-(Paralysis) म्हणतों. एकाच लिपीला बरोबर घेऊन चालणारी राष्ट्रभाषा हिन्दुस्तानी ही लंगडी आहे. हिन्दुस्तानीच्या दृष्टीने विचार केल्यास असें म्हणावें लागेल की, जो फक्त एकच लिपि जाणत असेल, तो सगळ्या देशाची संपूर्ण सेवा करण्यांत यशस्वी होणार नाही.

कोणत्याहि प्रान्तांत फक्त नागरी लिपीचाच प्रचार केला गेला असल्यास एकाच पक्षाचे लोक तिचा स्वीकार करतील. दुसऱ्या पक्षाच्या लोकांना

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

उर्दूला हाताशीं धरून आपली वेगळी संघटना करावी लागेल, आणि अशा प्रकारें एका समाजाचे दोन समाज होतील.

या सर्व गोष्टी ध्यानांत घेऊन वर्ध्याच्या हिन्दुस्तानी प्रचार सभेने असा निर्णय घेतलेला आहे की, राष्ट्रभाषा हिन्दुस्तानी शिकावयाची असेल, तर तिच्या दोन्ही लिपींबरोबरच ती शिकली पाहिजे.

इंग्रजीसाठी आपल्याला चार लिपि एकाच वेळीं शिकाव्या लागतातः- रोमन व इटॅलिक आणि दोघींच्या लहान व मोठ्या अशा दोन पोट लिपि. सर्व मिळून इंग्रजीसाठी १०४ रूपें शिकावीं लागतात. इंग्रजीश काढून टाकल्यास रोमन लिपीच्या १०४ अक्षरांचें ओझें कमी होईल. आणि त्याऐवजीं उर्दूचीं ३६ अक्षरें शिकावीं लागतील.

ज्याप्रमाणे हिन्दीमध्ये संस्कृतचें कठीण शब्द आहेत आणि त्यांचें मूळचेंच शुद्धलेखन कायम राखलें गेलें आहे. त्याचप्रमाणे उर्दूनेहि तितक्याच, किंबहुना त्याहूनहि अधिक आग्रहाने अरबी-फारसी शब्दांचें शुद्धलेखन (हिज्जे-Spelling) मुळाबरहुकूम कायम ठेवलें आहे. उर्दू भाषा व साहित्य यांच्याशीं आमचें भांडण नाही. मात्र आम्ही आपल्या हिन्दुस्तानीमध्ये ती भानगड ठेवणार नाहीं. अरबी-फारसीचे शब्द हिंदुस्तानींत येतात त्यांचे येथे जशा प्रकारचे उच्चार होतात तशाच प्रकारचे शुद्धलेखन आम्ही त्यांचें ठेवूं. कोठे कोठे शब्दांचें शुद्धलेखन मुळाप्रमाणे वेगवेगळें न लिहिल्यामुळे स्पष्ट अर्थबोध होणार नाही, हें खरें. परन्तु अशा प्रकारची अडचण सर्वच भाषांत दिसून येते. मागीलपुढील संदर्भाने शंका दूर होते. जसा उच्चार तसें शुद्धलेखन हा नियम ज्याप्रमाणे आम्ही हिन्दींत चालवितों, त्याचप्रमाणे तो हिन्दुस्तानींतहि चालवूं. परन्तु दोन्ही लिपींत हिदुस्तानी लिहावयाला-वाचावयाला शिकल्याखेरीज आपलें चालणार नाही.

हिन्दुस्तानी शिकतांना प्रारंभीं कोणत्याहि लिपीची मदत न घेतां आपण तोंडीं हिंदुस्तानी शिकूं शकतो. प्रथम कांही दिवस आपल्या प्राचीन लिपीच्या मार्फतहि आपल्याला हिन्दुस्तानी शिकतां येईल. परन्तु प्राचीन लिपींत आपल्याला हिन्दुस्तानीचें साहित्य मिळणार नाही. म्हणून जेव्हा हिन्दुस्तानीसाठी लिपि शिकूं, तेव्हा नागरी व उर्दू दोन्ही एकदम शिकूं. हिन्दुस्तानीची परीक्षा एकाच वेळीं दोन्ही लिपींत घेतली जाईल.

नुसतें विचार करीत राहिलें की, सर्वच गोष्टी अवघड व अशक्य वाटूं लागतात; करून पाहतां त्या सर्व सोप्या असल्याचें आढळून येतें.

हात लावला की सोनें !

लेखक : गो. रा. दोडके, बी. ए.

> नागपूरचे प्रसिद्ध तरुण साहित्यिक रा. दोडके यांनी 'हात लावला की सोनें !' ही जुनी कथा पुढील नाट्यसंवादांत नव्या नवलाईने व सरसतेने मांडली आहे. मानव हा देवाला असा वर मागेल की, जो शापच ठरेल, असें जें दोडके यांनी दाखविलें आहे, ते सद्यःपरिस्थितीस अनुसरून व अतिशय मार्मिक आहे. हा नाट्य-संवाद आबालवृद्धांस प्रिय होण्यासारखा आहे.

स्थळ— बागेचा एक भाग नाना प्रकारचीं फळा-फुलांचीं झाडें त्यांत आहेत. बागेच्या एका भागांत एका दालनाची भिंत पुढे आलेली. त्या भिंतींत एक खिडकी व एक दार. खिडकीजवळ जुईची वेल. ती खिडकींतून आंत बघत आहे. आंतून बोललेलें ऐकूं येतें.

"तथास्तु. राजा, ज्याला तुझ्या हाताचा स्पर्श होईल, तें तात्काळ सोन्याचें होईल. जातों मी."

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

थोडा वेळ अगदी शांत, नंतर—

जुई—ऐकलांत वर ?

सगळे—ऐकला.

मधू—(एक लहानसं झाड) आता काय या म्हाताऱ्या राजाची मजाच मजा !

माधव—(त्याच्याहून मोठं झाड) ए वेड्या, अर्थ कळत नाही म्हणून बोलतोस हें.

मधू—मजा नाही तर काय रे ? ज्याला हात लागेल, त्याचं सोनं होणार. या लोभी राजाच्या मनासारखं झालं, मजा नाही वाटतं त्याची ?

माधव—लहान आहेस तूं. जग नाही कळलं तुला अजून. अन् माणसं तर मुळींच नाहींत. अरे, याचा वर तुला आणि मलासुद्धा बाधेल. तूंहि सोन्याचा होशील.

मधू—मी सोन्याचा होईन ? मग छानच नाही का ?

जाई—होशील सोन्याचा. पण आहेस तेवढाच राहशील.

कुंद—वाऱ्यानं डुलणार नाहीस.

जाई—तुला फुलं येणार नाहीत. तुला वास राहणार नाही. मधुप तुझ्याभोंवती घिरट्या घालणार नाहींत.

कांचन—(एका कोपऱ्यांतून) नुसता सोन्याचा होशील व मेलेलाच उभा राहशील. जणू काय तुझं स्मारक म्हणून कुणीं तुझी सोन्याची मूर्ति घडवली आहे !

मधू—खरं कां रे ? अरे बापरे !

कनक—पहिल्यांदा नजर तुमच्यावर जाईल. तुम्हांला स्पर्श करून तो सोन्याचं करील. मला ना रंग, ना रूप, ना गंध, ना फळ म्हणून माळ्यानं मला दृष्टीआड ठेवलं. कोपऱ्यांत—

मधू—रुसूं बाई रुसूं, कोपऱ्यांत बसूं.

कनक—चूप रे. आज माझा कुरूपपणाच माझा जीव वाचवील.

कृष्णकमळी—ठीक आहे रे तुझं. पण आम्ही काय करणार ? देवानं आम्हांला सुंदर कां केलं कुणाला ठाऊक !

पारिजातक—या जगांत हीं माणसं नसतीं तर छान नसतं का झालं ! वेली, वृक्ष, झरे, नद्या, पर्वत, प्रपात, धरा, आकाश, सूर्य, चंद्र, फुलं, पांखरं-हींच जर जगांत असतीं, एकटं माणूस जर जगांत नसतं. तर नसत का जग सुखांत राहिलं ?

कनक—ज्या वेळेला तूं देव होशील, तेव्हा कर वरं हें सारं. माणूस या पृथ्वीच्या पाठीवर ओपथाला देखील उरूं देऊं नकोस. वेडा कुठला !

पारिजातक—वेडा रे काय ? या माणसांचा त्रास आपण झाडं झालों म्हणूनच का सहन करायचा ? या जागेहून त्या जागेवर नाचवतात. कुणी एखाद्या कुंडींत आम्हांला उभं करतो. कुणी आपल्या घरांतल्या दालनांत आम्हांला नेऊन ठेवतो. विचारतं का कुणी आम्हांला तें आवडतं का म्हणून ? आम्हांला काय वाटतं तें बघतं का कुणी ?

जुई—नाही तर काय रे ? बघ ना, काल माझ्या शाखा कापून टाकल्या. मी केवढ्यांदा रडलें, ओरडलें, विनवणी केली. " नका तोडूं रे खांद्या "—म्हणून विव्हळलें. पण दया नाही आली माणसाला. मला वाटतं, आपले शब्दच यांच्या कानांत जात नाहीत. आपण कांही हावभावानं सांगण्याचा यत्न केला, तर हे म्हणतात. " वाऱ्यानं झाड हलून राहिलं आहे ! " यांना ना डोळे, ना कान. केवळ आपल्यावर अत्याचार करायला देवानं यांना हातच काय ते दिले आहेत !

रसाळ—खरंच नाही तर काय ! मी नि माधवी जवळजवळ वाढलों. माझ्याकडे बघून माधवीला सुख वाटे तिच्याकडे पाहिलं की, माझं मन हर्षानं बहरून जाई. सूर्याचा पहिला किरण ती मला दाखवी व दुपारच्या वेळीं माझ्याच सावलींत ती निश्चित राही. कोमल होती ती. थोडंसं कांही झालं की, कोमेजे. पण एक दिवस आली माणसाला लहर. तिचीं मुळं त्यांनी खणून काढली, मला तिनं घातलेले विळखे सोडवले व ते तिला दुसरीकडे घेऊन गेले. केवढ्यांदा तिनं किंकाळी फोडली व मग मान टाकून दिली. माझ्या डोळ्यांत आसवं साचलीं होतीं. आणखी कांही दिवसांनीं मीं तिला पाहिली.—पण नुसतं कलेवरच माळी तिला हातांत धरून चालला होता !

जाई—मारी दुष्ट ही माणसांची जात ! आम्ही आपल्याच ठिकाणीं सुखांत राहण्याचा यत्न करतों. पण हा माणूस कांही आम्हांला राहूं देत नाही.

कनक—सुंदर कशाला झालीस ?

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कृष्णकमळी— तूं हिणवावं म्हणून !

कनक— मीं हिणवलं तुम्हाला ?

जाई— नाही तर काय ? सारखं सांगतो आहेस तुम्ही मरणार. मरणार म्हणून. सुंदर होऊन मरण लवकर आलं तरी पत्करलं. पण तुझ्यासारखं कुरूप होऊन जन्मजन्म जगणं नको, बाबा !

कनक— हसून घे माझ्या कुरूपपणाला. पण तुला पश्चात्ताप करावा लागेल.

जाई–करावा लगेल तेव्हा करीन मी. तूं नकोस सांगायला.

अशोक—ए गाढवांनो, माणसांसारखे तुम्ही भांडतां कशाला? मरण कांही दूरवर उभं नाही. जाता क्षण त्याला जवळजवळ ओढून आणतो आहे. म्हातारा आला की, आपल्याला हात लावणार, आपल्याला निर्जीव करणार. मृत्यु त्यां खोलींतून लवकरच बाहेर येईल, आणि आपल्या सगळ्यांच्या जिवाचं सोनं होईल! माणसाच्या बागामध्ये राहून मरतां मरतां देखील भाडायचं, हा गुण खूप छान घेतलांत! कांहीच कस रे कळत नाही तुम्हांला ?

शेवंती-(बाजूच्या लहान गुलाबाला) बघ मला कशा सुंदर कळ्या आल्या आहेत !

गुलाब—किती सुंदर दिसतेस तूं !

शेवंती—तुझीं कोवळीं लालसर पानं फुलांहूनहि सुंदर दिसतात रे !

गुलाब—हरबऱ्याच्या झाडावर चढवतेस मला ?

शेवंती—नाहीं रे नाहीं, वनवत नाहीं कांही. खरं तेंच सांगतें.

जुई— म्हाताऱ्यान तर दालनांतली वस्तु न वस्तु सोन्याची करून टाकली. आता लौकरच येईल तो बाहेर.

कुंद-आता भरली आपली वेळ.

[बागेंत जलवंती येते. तिने निळे वस्त्र परिधान केलें आहे व त्यावर शुभ्र रेखा आहेत. एखाद्या फेसाळलेल्या लाटेप्रमाणे तिचें रूप.]

जलवंती-वेळ भरली ? म्हणजे ? झालंय् काय ?

मधू-राजाला वर मिळाला आहे. ज्याला तो हात लावील, तें सोन्याचं होईल !

जलवंती--मग तुम्हांला नाही व्हायचं का रे सोन्याचं ? किती सुंदर दिसाल रे तुम्ही ! ही बाग कांही झाडांची, फळाफुलांची राहणार नाही. सोन्याची बाग होईल ती !

अशोक—आमचं पोषण करायचं तुझ्या जिवावर आलेलं दिसतंय्.

जलवंती— नाही रे नाही. तसं नाही बरं. गंमत केली तुमची.

पारिजातक— छान् ! कांही वाटतं ग तुझ्या जिवाला ?–

जलवंती— ए, रागवूं नको रे. या लोभी राजाला मी प्रायश्चित्त देईन. हीं माणसं वर मागतात की, शाप मागतात, कुणाला ठाऊक ?

गुलाब— कां ग ?

जलवंती— अं. असंच. जातें मी.

शेवंती— पण तूं प्रायश्चित्त कसं देशील ?

जलवंती— कळेल मग तुम्हांला. पण कुणाला ठाऊक तुमच्या ध्यानांत येईल की नाही तर ! [जाते]

कांचन— कुणाला ठाऊक काय करणार आहे तर !

जुई— हं, आता यायला निघाला वरं का इकडे राजा.

[सगळे दाराच्या दिशेला आपली नजर वळवितात.]

अशोक— अहो, त्याच ठिकाणीं भूमीनं आपल्याला जखडून टाकलं आहे. नाहीतर इथून सगळेच्या सगळे पळून गेलों असतों.

[दारांतून राजा प्रवेश करतो. सगळ्या बागेवर नजर टाकतो. प्रसन्न अंतःकरणाने राजा कुंडासमोर जाऊन उभा राहतो. तो ठायींच उभा राहून मागं वाकतो. सारीं झाडं टकमक त्याच्याकडे बघत राहतात.]

राजा—हा वारा कां हलवतो झाला ! (त्याला हात लावतो) सोन्याचं झालास. देवदूताची वाणी, ती कां निष्फळ व्हायची ! ······किती सुंदर दिसतं आहे झाड ! सगळं सोन्याचं. फांद्या सोन्याच्या, पानं सोन्याचीं, फुलं सोन्याचीं. देवा धन्य आहे तुझी ! तुझ्या कुबेराच्या घरीं साऱ्या त्रिभुवनाची संपत्ति आहे. तिचं दर्शन आम्हां मर्त्य मानवांना कुठून घडणार ? पण आता मी मात्र कुबेराच्या सुवर्णसंच-

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

याचं जगाला दर्शन घडवीन. (बोलत बोलत दुसऱ्या झाडाजवळ येतो व खाली बघून) ही तर लाजली. हात लागला रे लागला की, गेलीच संकोचून. वेडे, इतकी लाज ग कशाची? कशाला? (तिला हात लावतो.) गेला सारा संकोच. आता नाही मिटायचीस. सोन्याची झालीस ना? हा गुलाब किती प्रेमानं वाढविला! आता यावर कोंवळीं कोंवळीं पानं आहेत. केवढीं सुंदर आहेत तीं! मला वाटायचं, तीं मोठीं होतील, हिरवीं होतील, नाजुकपणा जाईल त्यांच्यांतला. आता याच्या फुलांच्या पाकळ्या गळून पडायच्या नाहींत. सौंदर्याला शाप आहे क्षणभंगुरतेचा; पण तो शापहि मा आता परतवून लावीन. [हात लावतो.] आता फुलापानांचं रूप पालटायचं नाही. त्यांची माती व्हायची नाही. क्षय अथवा मृत्यु आता तुझ्याकरिता नाही. (दुसऱ्या एका झाडाकडे बघत) किती सुंदर फळं आहेत झाडावर! रसरसलेलीं! किती सुंदर रंग! घेऊं या एक खायला (तोडायला म्हणून फळाला हात घालतो. तें सोन्याचं होतं. विस्मयानं) खायचं फळ देखील सोन्याचं होतं! (आणखी दोनतीन फळांना हात लावतो) सगळीं फळं सोन्याचीं झालीं!

[इतक्यांत त्याच्या कानांवर हाक येते "-बाबा बाबा!" थोडा वेळ राजा आवाज आलेल्या दिशेकडे बघत राहतो. पुन्हा "बाबा, बाबा! कुठं आहांत तुम्ही?"]

राजा—इकडे बागेंत आहे बेटा.

[आवाज येतो—"बाबा, हीं फुलं बघा, किती सुंदर आहेत!"

राजा—बेटा. कुठं आहेस तूं?

[आवाज—"गुलाबाच्या झाडाजवळ. त्यालाच आलीं आहेत फुलं. जुळून आहेत दोन्ही. तोडतें नि आणतें तुम्हांला दाखवायला."]

राजा—बरं आण. इथं मी चमेलीच्याजवळ आहें.

[धावत धावत राजकन्या प्रवेश करते.]

राजकन्या—बाबा, बघा हीं फुलं. किती सुंदर आहेत! किती गोड वास येतो! घ्या, बाबा. (ती राजाच्या हातांत फुलं टाकते व राजाकडे पाठ करून उभी राहते.) तुम्हीं वास घेतला की, माझ्या वेणींत खोवून द्या, हं. (राजाने फुलं हातांत घेतांच तीं सोन्याचीं होतात.) वास घेतला बाबा? किती मधुर आहे. नाही हो? आता घाला ना माझ्या वेणींत.

राजा—(फुलं दूर फेकतो) केवढी मोठी अळी होती ग फुलांवर! नि खालच्या पाकळ्याहि तिनं खाऊन टाकल्या होत्या. दुसरीं आण, मग मी घालीन तुझ्या वेणींत.

राजकन्या—ही अळी कुठली फुलांत? किती सुंदर होतीं! दुसरीं नाहींत मिळायचीं अशीं.

राजा—मिळतील ग, बघ तूं बागेंत. आणि न मिळालीं तर मी सोन्याचीं देईन.

राजकन्या—पण सोन्याच्या फुलांना वास कुठं असतो? असा रंग कुठचा त्यांना? (फुलं मिळतील म्हणून सभोवताली बघते. सोन्याचीं झाडं तिला दिसतात.) बाबा, हें काय? (झाडांजवळ जाते) सारीं सोन्याचीं झाडं! बाबा, हें काय?

राजा—देवाची दया! बघ ना, किती सुंदर दिसताहेत!

राजकन्या—पण बाबा, ह्या झाडांचं पानहि हलत नाही. पाकळ्यांत जीव नाही, रंग नाही. किती रंगीबेरंगी फळंफुलं होतीं, इथल्या झाडांना!

राजा—जा बाळ, एखाद्या झाडाचं सुंदरसं फळ तोडून आण बरं. (ती जाते. व राजा लांबच्या झाडाजवळ निघून जातो. ती फळं आणते.)

राजा—ठेव तिथंच, नि पाणी आण प्यायला.

[राजकन्या निघून जाते. तो हळूहळू फळांजवळ येतो. त्यांच्याकडे आधाशाप्रमाणे क्षण दोन क्षण बघतो. आणि नंतर एकाएकीं उचलतो; व एकदम निराशेने दूर भिरकावतो. राजकन्या पाणी आणते.]

राजा—ठेव तिथंच.

राजकन्या—बाबा, फळ खाइं तुम्हीं? पाणी आणलं आहे.

राजा—ठेव तिथंच. मी येतो तिथं. (मग राजा पेल्याजवळ येतो. पाण्याकडे बघत बघत पेला उचलतो व तसाच तो खाली टाकतो.)

राजा—पाणीहि सोन्याचं व्हावं! हा वर मीं मागितला नव्हता! (दुरून राजकन्येचा आवाज ऐकूं येतो "बाबा, त्या दिवशींचीं फळं आज पिकून तयार झालीं आहेत. घेऊं मी तोडून?")

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

राजा—(मोठ्यानें) तोडून घे, बेटा.

राजकन्या—तोडतें बाबा, नि आणतें तुमच्याकडे. इतकीं सुंदर दिसतात बाबा, कीं, खावींशीं वाटतात.

राजा—आता ही मला "खा" म्हणेल, मीं "नाहीं" म्हटलं, तर आपणच माझ्या तोंडांत फोड घालील. आणि-काय होईल आता?

राजकन्या--बाबा, बघा, किती मोठीं आहेत! घ्या, बाबा, एक घ्या तुम्हीं. एक मीं खातें.

राजा--मला आता कांहींच नको ग खायला. आताच मीं एक खाल्लं ना. आणि त्यावर पाणी प्यालों. तूं खा आता. खाईन मग मी.

राजकन्या--(जवळ येत येत) नाही बाबा, तुम्हाला खायलाच हवं. नाहीतर मीहि खाणार नाहीं. खायलाच हवं तुम्हाला.

राजा--नको ग मला.

राजकन्या—पण नको कां?

राजा—खावंसं नाही वाटत.

राजकन्या--एवढंसं तर फळ. खा ना बाबा. (ती राजापासून हाताच्या अंतरावर असते, व राजासमोर फळ धरते. राजा चटकन् मागं सरतो व एकदम् ओरडतो.)

राजा--दूर. दूर राहा. जवळ येऊं नकोस माझ्या.

[राजकन्या भिऊन व विस्मयानं मागं सरते व राजाकडे बघत राहते. नंतर हुंदके देऊन रडूं लागते.]

राजा—बेटा, तूं रडतेस का? तुझ्यावर नाहीं रागावलों. मीं तुला दूर राहायला सांगितलं. पण तुझ्यावर रागावलों नाहीं.

राजकन्या--बाबा, बाबा, मला जवळ घ्या ना.

राजा--नाहीं बेटा.

राजकन्या--खचित रागावलां तुम्ही माझ्यावर. काय आगळीक घडली आहे माझ्याकडून, माझ्या ध्यानांतहि येत नाही! पण घडली असलीच पाहिजे. बाबा, आजवर असं नाही बोललां तुम्ही कधीं.

राजा—अग, पण मी सांगतों. मी नाहीं रागावलों तुझ्यावर.

राजकन्या-नाही बाबा, रागावलांत तुम्ही.

राजा—नाहीं ग, नाहीं रागावलों. (तो आपल्या हातांकडे बघतो, मुलीकडे बघतो, पुन्हा हातांकडे बघतो.)

राजकन्या—मग बाबा, घ्या मला पोटाशीं. (तो हात पुढे करतो; व पुन्हा तो मागे ओढून घेणार, तोंच मुलगी राजाच्या मिठींत येते व सोन्याची होते.)

राजा-(मुलीच्या अंगावरून हात फिरवीत हताशपणें.) तूंहि सोन्याची झालीस!...... तुझा स्पर्श होईल त्याचं सोनं होईल हा शाप...... की, हा वर? आतावर कांही खातां आलं नाही. खाण्याकरिता फळं हातांत घेतलीं, तीं सोन्याचीं झालीं. प्यायला पाणी घेतलं त्यांचंहि सोनं झालं.... पण हा असा सूड घ्याल, अशी कल्पना नव्हती.... अरे, माझी ही मुलगी, तिच्यावरहि तुम्हीं आपला सूड उगवून घेतला ना ! क्षणापूर्वींच तिची चिवचिव चालली होती. तें तरी तिचं बोलणं ऐकायचं होतं. क्रूरकर्मी देवांनो! तुम्हांलाहि तिची दया आली असती! माझ्यावर सूड घ्या! तिचा जीव कां घेतां? पण तुम्हांला तरी कां बोल लावायचा ! तुम्ही आपल्या रीतीनं वागलांत. माझा लोभ... सोन्याचा हव्यास.... संपत्तीच्या दर्शनाची, संचयाची हाव! यांनीच माझ्याजवळून सगळं हिरावून घेतलं! भोवतालीं तर सोन्याचीं झाडंच्या झाडं उभीं आहेत... पण काय त्या सोन्यांत जीव आहे! ना अन्न, ना पाणी!... ही माझी पोरगी!... प्राणशून्य पडली आहे !... मला ती सोन्याची नको. तिला पुन्हा उभं राहूं द्या, हसूं द्या, बोलूं द्या.... (हात आपल्याच अंगाला लावतो.) हो ना, सोन्याचा हो. यातना तरी थांबतील, पण कुठला होशील सोन्याचा? ही तर देवांची शिक्षा आहे. दुःख सारखं होत राहायचं. आणि, निराकरणाचा मार्ग मात्र आपल्या हातांत नसायचा!...... पाणी... पाणी...! (मानेवरून हात फिरवतो. जीव कासावीस होतो. जमिनीवर बसतो व निश्चल पडून राहतो.)

देवदूत--(प्रवेश करून) राजा, झाडं सगळीं सोन्याचीं झालीं. तुझीच मुलगी ही. ही देखील सोन्याची झाली! भाग्यवान् आहेस तूं! तुझं-मनोरथ

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पूर्ण झालं ! पण, राजा, तूं बोलत कां नाहीस ? तुझ्या मनाप्रमाणं मीं केलं. वर फळला देखील ! तूं असा निपचित कां पडून आहेस ?

राजा—(कष्टाने उठून उभा राहतो.) घ्या आपला वर परत. मला मुक्त करा.

देवदूत--तुला वर दिला आहे, राजा ! परत नाही घ्यायचा तो ! या सगळ्या सोन्याचा तुला उपभोग घ्यायचा आहे ! अजून तुला सगळं जग सोन्याचं करायचं आहे !

राजा--नाही. मला सोनं नको, कांही नको. आपला वर परत घ्या ही बघा. माझी मुलगी एखाद्या प्रस्तरमूर्तीप्रमाणं चेतनाहीन पडली आहे. जिथं माझा हात लागतो तिथली, हालचालच नाहीशी होते ! चेतनाच निघून जाते ! फळ क्षुधा निवरूं शकत नाही. पाणी आपली चंचलता टाकून देतं, तृषा भागवीत नाही. हे हात आता नुसता विनाश करूं शकतात ! कुणालाहि सुखविण्याचं सामर्थ्य या हातांच्या ठिकाणीं राहिलं नाही. वर परत घ्या आपला !

देवदूत--वर तूं मागितलास, राजा ! तुझा लोभीपणा तुला भोवला ! तुझ्या दुःखाला तूंच कारण झालास ! आणि, इतरांच्या जीवनविनाशाला !

राजा—शरण आहें मी. माझ्याकरिता नव्हे, पण ह्या सगळ्या जिवांकरिता मला वरांतून मुक्त करा.

देवदूत—तुम्हांला वर काय मागावा, हेंहि कळत नाही ! तुम्ही माणसं वर असा मागता कीं, ज्यानं तुमचा स्वतःचा व इतरांचाहि विनाश होतो! तुमच्या तपस्येनं देव वळतो. आपल्या मोठमोठाल्या शक्ति स्वाधीन करतो. पण तुम्ही······ ! जगाचा विध्वंस करायला प्रवृत्त होतां ! आणि, मग तुम्हांला दिलेली शक्तिच देवाला तुमच्यावर उलटवावी लागते .....! तूं हावरटपणानं वर मागितलास आणि त्याच्या ओझ्यानंच कासावीस झालास. वर मागतांना तूं तहान, भूक, आपले जीवलग सारे कांही विसरलास !

राजा—मला शिक्षा करा! शाप द्या! परन्तु ज्यांना ज्यांना माझ्या हाताचा स्पर्श झाला, त्या सगळ्यांना जीवदान द्या!

देवदूत—तथास्तु, सगळ्यांना हात लाव. (देवदूत निघून जातो) [राजा सगळ्या झाडांना हात लावतो. व नंतर मुलीजवळ येऊन तिला हात लावतो. ती उठून उभी राहते.]

राजकन्या—बाबा. मला झोप लागली होती ?

राजा—होय, बेटा खूप खेळूनमारून आली होतीस. दमून गेली होतीस. इथंच तुला झोप लागली ! (तो तिला पोटाशीं घेऊन कुरवाळतो. मग झाडांना हात लावीत लावीत आंत निघून जातो. मुलगी उडतबागडत झाडांमधून फिरत असते.)

वऱ्हाड-मध्यप्रांत व निजाम राज्य या विभागांतील

एकमेव मराठी वर्तमानपत्र

मातृभूमि

कार्यालय — अकोला (वऱ्हाड)

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

उर्दू काव्यांतील इक्बालची महात्मता

(१८७०–१९३८)

वसंत अनंत शहाणे, बी. ए. [ऑनर्स]

रा. वसंतराव शहाणे हे तरुण साहित्यिक उर्दू वाङ्मयाचे दर्दी आहेत. उर्दू कवींवरील त्यांचे लेख अतिशय चटकदार असतात. या लेखांच्या रूपाने शहाणे यांनी उर्दू न जाणणाऱ्या मराठी वाचकांसाठी एक नवीन दालन उघडलें आहे, यांत शंका नाही.

महाकवि इक्बाल यांजवरील प्रस्तुत लेख, शहाणे यांनी त्यांच्या-संबंधीं आणखी लिहावें, अशी इच्छा वाचकांच्या मनांत उत्पन्न करील.

ऑस्कर वाइल्डने येशू खिस्ताला कविमंडळाचा मोहरा म्हटलें आहे!

शेले आणि सोफोक्लिस यांच्या पंगतीला खिस्ताला बसवून एकप्रकारें ऑस्कर वाइल्डने आर्ष युगापासून तों आधुनिक युगापर्यंतचे सगळे द्रष्टे आणि महात्मे हे जणु कविच असतात, असें प्रतिपादन केलेलें नाही काय? येशू खिस्ताच्या विलक्षण कल्पकतेंतूनच त्याची मानवजातीची उदात्त आति उत्तुंग कल्पना जन्माला आली, व आपल्यालाहि तिचें रहस्य कळावयाला कल्पकताच हवी, नाही का ? पण, खिस्ताचें जीवन हेंच केवढें बहारदार काव्य आहे! एस्किलस, डँटे, शेक्सपियरादि महान् लेखकांच्या अथवा कोठल्याहि ग्रीक शोकान्तिकेंतल्या मर्मव्यथा या खिस्ताच्या जीवनाच्या शेवटच्या अंकापुढे फिक्याच पडतील!

पण, द्रष्टे आणि महात्मे हे जसे थोर कवि असूं शकतात, तसे थोर कवि हे द्रष्टे आणि महात्मे असूं शकणार नाहीत काय? खिस्ताचें महात्म्य हें जसें काव्यात्म, तसें गटे, रवीन्द्रनाथ आणि इक्बाल यांचें काव्य हें महात्म्य नव्हे काय?

उर्दू वाङ्मयाची महात्मता इक्बालच्या काव्य-रूपानें ओसंडत आहे!

'इक्बालमंद' याचा अर्थ 'भाग्यशाली' असा आहे. खरेंच, इक्बालने आपलें नांव सार्थ करून दाखविलें! कविकुलगुरूंपासून रवीन्द्रांपर्यंत अनेक मेधावींना मोहित करणाऱ्या आत्म्याच्या अनुभूतीचाच इक्बालने काव्यपूर्ण आविष्कार केला. कवि हे केवळ द्रष्टे (prophet) नव्हेत, तर ते नियंत्रकहि (Censor) असूं शकतात. रवीन्द्राप्रमाणे इक्बालहि देशप्रेमी, द्रष्टा, तत्त्वज्ञ, महाकवि आणि नियंत्रक होते.

काव्य ही जीवनावरील टीका आहे, ही मॅथ्यू अर्नोल्डची व्याख्या कोणाला ठाऊक नाही? इक्बालचें काव्य हें जसें त्याच्या आत्मानुभूतीचें दर्शन घडवितें, तसें तें भोवतालच्या जीवनावर टीकेचा प्रहार करतांना आढळून येत नाही काय? इक्बाल एका नव्या युगाचा तारा आहे! त्याच्या प्रकाशाने उर्दूचें जगत् दैदीप्यमान् झालें आहे! ज्योतीनें केवळ अंधारच नाहीसा होतो, असें नव्हे, तर मनांतहि चांदणें फुलतें; डोळ्यांवरची झापडच केवळ उडून जाते, असें नव्हे, तर दृष्टीचा लाभ होतो. इक्बाल हा केवळ निरीक्षक नाही, तर नियंत्रक आहे. मिल्टनबद्दल एका टीकाकाराने [De Quinsey] उद्गार काढले आहेत की, He was not merely an author amongst authors, a poet amongst poets but a power amongst powers.' इक्बालच्या काव्यांत मिल्टनच्या काव्याप्रमाणे

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

चंडांशूची शक्ति आहे! इक्बाल हा आधुनिक उर्दूच्या कविमंडळाचा मोहरा आहे! इक्बाल हा रवीन्द्रनाथांप्रमाणे भारताच्या व विशेषतः उर्दूच्या उमेदीचा उमदा तुरा आहे!

महाकवि हा उत्कृष्ट आलोचक असू शकतो काय? सेनेकानें नाही का म्हटलें की, कवितेचा टीकाकार हा कविच हवा म्हणून! उत्तम कवि हा उत्कृष्ट टीकाकार होऊं शकत नाही, असे बेन जॉन्सनने उद्गार काढले आहेत. ॲरिस्टॉटल हा तर टीकाशास्त्राचा आद्य प्रणेता; पण तो कवि होता, हें कदाचित् त्याच्या टीकाकारांनाच ठाऊक असेल! स्कॅलिगर, सिडने, ड्रायडन व डॉ० जॉनसन यांचें 'काव्य' (?) कशाचें गमक आहे?

आणि, थोर कवि काय कमी भुक्कड टीकाकार असतात? गटे हा एकोणिसाव्या शतकांतल्या समस्त कवींचा मेरुमणि; पण, स्विनबर्नने गटेला टाकाऊ टीकाकार म्हटलें आहे! बायरन, स्कॉट, वर्डस्वर्थ, व्हिक्टर ह्युगो यांचीं मतें टीकाशास्त्राच्या कसोटीला कितपत उतरूं शकतील?

या नियमाला इक्बाल हा मात्र मोठाच अपवाद आहे!

इक्बालची काव्यप्रतिभा जेवढी ऊर्जस्वल, तेवढीच त्याची टीकात्मकताहि ओजस्वी आहे! आपल्या ज्ञातीचें, इस्लामी राष्ट्राचें, इस्लामी तत्त्वज्ञानाचें—एवंच, अखिल मुसलमानी जगताचें अवनत मस्तक पुनश्च उन्नत करण्याचा संकल्प उर्दू वाङ्मयांत प्रथमतः इक्बालने केला. मुसलमान एकच पैगंबर मानतात. परंतु, मर्मज्ञांच्या दृष्टीने इक्बालने सुद्धा एखाद्या पैगंबराचेंच कार्य केलें आहे. ग्रामी कवीने म्हटलेंच आहे:—

"दरे-दीदा-मानी निगरां हजरत इक्बाल
पैगंबरी कर दो पयंबर नतवाँ गुफ्त!" *

१९३८ सालीं इक्बाल जिवंत असतांनाच लाहोरच्या 'इंटरकॉलेजिएट मुस्लीम ब्रदरहुड' या संस्थेने 'इक्बालदिन' साजरा केला! त्या प्रसंगीं हिंदी मुसलमानांच्या विविध विचारांचे वारे कसे वाहतात, हें दिसून आलें. राजकीय विभागणीकारांना इक्बाल हें प्रचाराचें अधिष्ठान आहेसें वाटलें! सांस्कृतिक न्यूनगंडाने पछाडलेल्यांना ती आत्मगौरवाची संधि आहेशी वाटली! राष्ट्रवाद्यांना इक्बालच्या राष्ट्रीयतेबद्दल प्रेम फुटलें!

परंतु, एवढ्या प्रचाराच्या व प्रदर्शनाच्या अनंत आवरणाखाली दडलेलें एकमेव सत्य मात्र अगदी निर्विवाद आहे. आंतरराष्ट्रीय कीर्ति संपादन करणारा इक्बाल हा (जनाब जिना खेरीज करून) एकटाच हिंदी मुसलमान आहे! रवीन्द्रनाथांच्या जोडीला बसण्याची योग्यता इक्बालने संपादन केली! इक्बालचीं मतें इष्ट असोत की अनिष्ट, स्वागतार्ह असोत की तिरस्कारार्ह, राष्ट्रीय असोत की जातीय—इक्बाल हा एक महाकवि आहे! हिंदी मुसलमानांच्या बुद्धीवर इक्बालचा प्रभाव विलक्षण आहे! त्या दृष्टीने इक्बाल हा युगपुरुष आहे!

इक्बाल हा उर्दूचा महाकवि की, फारसीचा महाकवि हा वाद अजून संपलेला नाहीं!

आश्चर्य असें की, इक्बालने प्राथमिक रचना पंजाबी भाषेंत केली आहे. तदनंतर इक्बालची राष्ट्रीयता जागृत झाली. राष्ट्रीयतेचा अस्त झाल्यानंतर इस्लामी सांस्कृतिक विश्वप्रेम [Tribal Love of Islam] निर्माण झालें. तत्त्वज्ञानाचें नवीन मूल्यें याच काळांत प्रसवलीं. हें तात्त्विक अधिष्ठानच इक्बालच्या अद्वितीय महत्पदाचें गमक आहे!

इक्बालच्या जीवनावर, अंतर्मनावर आणि काव्यावर पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाचा अतिशय परिणाम झाला आहे. एका पत्रांत ते म्हणतातः "Most of my life has been spent in the study of Europeon Philosophy and that view point has become my second nature." इस्लामी तत्त्वज्ञानाचें इक्बालने पाश्चिमात्य ज्ञानभिंगांतूनच निरीक्षण केलें आहे! 'इस्लामी धर्मविचारांची पुनर्रचना' ('Reconstruction of Religious thought in Islam') या ग्रंथांत इक्बाल म्हणतात की, "आमचें जीवित पाश्चिमात्यांच्या पावलांवर पाऊल टाकीत आहे! पाश्चिमात्य संस्कृतीचें देदीप्यमान बाह्यांग भुरळ पाडणारें आहे! आपल्याला त्या संस्कृतीचा आध्यात्मिक गाभा आत्मसात् केला पाहिजे."

*"In the eyes of those who know the secret of things, Iqbal performed a prophet's mission, yet he cannot be called a prophet."

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(" The most remarkable phenomenon of modern history, however, is the enormous rapidity with which the world of Islam is Spiritually moving towards the West. There is nothing wrong in this movement. Our only fear is that the dazzling exterior of Europeon culture may arrest our movement, and we may fail to reach the true inwardness of that culture. ")

इक्बालच्या तात्त्विक अधिष्ठानाचे दोन विशेष प्रामुख्याने नजरेंत भरतात. पहिला विशेष असा की, आत्मज्ञानाचें अधिष्ठान श्रद्धा आहे, बुद्धि नव्हे. दुसरा विशेष या पहिल्या मुद्द्यावरच अधिष्ठित आहे. अंतर्ज्ञानाची गुरुकिल्ली ही गूढ अनुभूतीच होय, शास्त्रीय अनुभूति नव्हे ! इक्बालचें तत्त्वज्ञान शोपेनहोरच्या 'Will to live', नीत्सशेच्या "Will to Power" अथवा बर्गसाँच्या "Elan Vital" चेंच अनुसरण करीत आहे. आधुनिक जगतांतल्या या श्रेष्ठ विचारवंतांचे दृष्टिकोन इक्बालनं आत्मसात् केले आहेत–पण, अस्मिता मात्र सोडलेली नाही !

कँट हा अध्यात्मवादी आहे, तर अध्यात्म ही इक्बालची केवळ पार्श्वभूमि आहे. इक्बाल हा धार्मिक गूढवादी आहे !

प्रि० तासीर म्हणतात " For Iqbal, Personality is the measure of all things, the value of all values." प्रोटॅगोरासने नाही का म्हटलें: " Man is the measure of all things ? " रवीन्द्रनाथांनी उपनिषदांतली व वॉल्ट व्हिटमनच्या काव्यांतली उदाहरणें देऊन इक्बालच्या तात्त्विक विचारप्रणालीचाच पुरस्कार केला आहे ! इक्बाल हा 'Activist' आणि 'practical philosopher' म्हणजे कार्यकर्ता तत्त्वज्ञ आहे, असें मौलाना तासीर यांना वाटतें !

युरोपीय वातावरणात कायावाचामनें तन्मय झाल्यानंतर निर्भेळ राष्ट्रवादाचें वैफल्य इक्बालच्या निदर्शनाला आलें. परंतु, रवीन्द्रनाथांप्रमाणे राष्ट्रांतरीय वैचारिक परंपरेचें अनुकरण इक्बालने केलें नाही ! इस्लामी समाजाबद्दल इक्बालने असे उद्गार काढले आहेत की, " Islamic society is the only society which has so far proved itself a most successful opponent of the race idea. " आणि, इक्बालने स्वतःला या कल्पनेशीं बांधून घेतलें. त्याच्या 'दार्शनिक जातीयतेचें' रहस्य तें हेंच ! इक्बाल जातीय नाही हें सिद्ध करण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका चाणाक्ष टीकाकारानें असें म्हटलें आहे की, " He is as communal as Homer, Dante, Milton and Kalidas, who utilize and refer frequently to gods, myths, beliefs and symbols of their various culturel and religious groups. "

बंकिमचंद्रांच्या 'वन्देमातरम्' ची ओजस्विता आत्मसात् करणाऱ्या राष्ट्रवादी इक्बालच्या मुखांतून ते ओजस्वी उद्गार बाहेर पडले:

" सारे जहाँ से अच्छा हिन्दोस्ताँ हमारा
हम बुलबुलें हैं उसकी वह गुलिस्ताँ हमारा ! "

परंतु इक्बालची राष्ट्रीयता होरपळून गेली व जातीयतेच्या उष्ण रक्तांतून ते साम्प्रदायिक विचारांचे निखारे बाहेर पडले !

" चीन व अरब हमारा हिन्दोस्ताँ हमारा
मुस्लीम हैं हम वतन है सारा जहाँ हमारा ! "

अथवा

" मुस्लीम ख्वाबिदा (स्वप्नाळु) उठ
हंगामाआरा तू भी हो ! "

परंतु, कांही उर्दू टीकाकारांचें मत असें आहे की, इक्बालची ही साम्प्रदायिक भूमिका विश्वबंधुत्वांत व विश्वप्रीतींत पर्यवसित झाली. दलितांचे व पीडितांचे पुरस्कर्ते म्हणून इक्बालचें काव्यपुष्प अधिकच विकसित झालें. हाच या उद्यानाचा खरा बहर ! राष्ट्रीयतेच्या व जातीयतेच्या चाकोरीतून भग्न मनःस्थितींत बाहेर पडलेल्या इक्बालने आर्त स्वरांत म्हटलें आहे:—

" उठो ! मेरी दुनिया के गरीबों को जगा दो ! "

इक्बालची मान्यता ती हीच ! इक्बालचें वैचारिक प्रागल्भ्य तें हेंच ! इक्बाल हे केवळ समाजा-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भिमुख नसून समाजवादी आहेत, असें हे उर्दूचे बोल बोलतात ! लेनिनला साधुपदावर इक्बालने नाही का चढविलेलें ? हुकूमशाही व भांडवलशाही यांच्यावर इक्बालने हात उगारला आहे ! लेनिनची स्तुति करणाऱ्या इक्बालने लोकशाहीची मात्र टिंगल केली आहे ! लोकशाहीला त्याने " तमाशा " म्हटलें आहे ! परंतु, मद्रासच्या एका भाषणांत " मी एखाद्या मुसलमान देशाचा सर्वाधिकारी झालों, तर त्याची उभारणी समाजवादी घटनेवर करीन — " अशी घोषणा इक्बालने केलेली कदाचित् पुष्कळांच्या स्मरणांत असेल !

इक्बालची तात्त्विक, सांस्कृतिक व विशेषतः राजकीय मतप्रणाली बघून 'Genius is the most complex figure' या वचनाची इत्यर्थता कळूं लागते !

आपल्या कविजीवनाच्या तिसऱ्या अध्यायांत इक्बालची भूमिका ज्ञातिप्रधान इस्लामी कवीचीच बनली, यांत शंका नाही. पण, मुस्लिम राजकारण-धुरंधरांच्या दृष्टीने इक्बालने या काळांत हिंदी स्वातंत्र्याचाच नव्हे, तर जगांतल्या साठ कोटी मुसलमानांच्या विमोचनाचा मार्ग शोधून काढला ! तो म्हणजे ज्याला लोक 'पाकिस्तान' समजतात तो ! डॉ० अंबेडकर यांनी आपल्या विद्वत्तापूर्ण ग्रंथांत म्हटलें आहे—" The Resolution is so worded as to give the idea that the scheme adumbraed in it is a new one. But, there can be no doubt that the Resolution merely resusciates a scheme which was put forth by Sir Mahomad Iqbal in his presidential address to the Muslim League at its Annual Session held at Lucknow in December 1930 (pp. 5)

परंतु, मला असें वाटतें की, आधुनिक जगांतल्या या चित्रविचित्र वादंगांच्या भरीस पडलेल्या या महान् कलावंताची थोरवी त्याच्या वैचारिक अधिष्ठानांत नसून, समृद्ध मानवी जीवनाचा आविष्कार करणाऱ्या त्याच्या कलेंत आहे. कला हीच खरी कसोटी ! काव्य हीच कसोटी ! रवीन्द्रनाथ आणि इक्बाल यांच्याकडे मुख्यतः कलावंत (म्हणजे कवि) म्हणूनच आपण पाहिलें पाहिजे, असें मला वाटतें. ए० ए० स्मर्नाव्ह नांवाच्या रशियन लेखकाने नुकतेंच शेक्सपियरच्या नाटकांचें मार्क्सवादी विवेचन केलें आहे !

इक्बालची महात्मता ही सांस्कृतिक अथवा राजकीय नसून, ती वाङ्मयीन आण काव्यात्म आहे. याचा विसर मला कदापि पडणार नाही.

आणि, ही महात्मता चिमुकल्या लेखांत दिग्दर्शित करणें म्हणजे एखादें विशाल निसर्गदृश्य [Landscape] एखाद्या पोस्टाच्या लहान तिकिटावर चित्रित करण्यासारखेंच नाही काय ?

गुप्त सरस्वती (साहित्यिकांचीं पत्रें)

१ कै० भा. रा. तांबे
२ कै० डॉ० माधवराव पटवर्धन

१

कै० कविवर्य भा. रा. तांबे यांचें एका तरुण कवीस पत्र

लष्कर [ग्वाल्हेर]
ता. २६-५-१९३३

... आपल्या आयुष्यास 'शापाचें स्वरूप आलें आहे'—असें आपण कां म्हणतां ? असा प्रश्न विचारण्याचें धाडस मीं करूं नये. आपल्याला सर्वांनी धिक्कारलें, असें आपण कां म्हणतां ? या प्रश्नांचीं उत्तरें देण्याची विनंती करून, मी आपल्या मनाला दुखवूं इच्छित नाहीं. पण अनेक वर्षे टक्केटोणपे सोसून, जगाचे धक्के सोसून, माझा अनुभव असा आहे की, मनुष्य हा मूलतः सत्यप्रिय

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नीतिलोलुप व आनंदी प्राणी आहे. असत्य, दुराचार व दुःख यांचा त्याला स्वभावतः तिटकारा असतो. घाडेल्याला देखील असत्य व दुःख नको असतें. मनुष्याची परिस्थिति त्याच्या मूळ स्वभावाशीं असदृश व विसंवादी असत्यादिकांचा आश्रय करावयास भाग पाडीत असते. मनुष्याचा आधार जो परमात्मा, ज्यापासून तो उद्भवला, त्याच्या ठायीं तर असत्यादि गोष्टी संभवतच नाहींत. त्या सत्यस्वरूप, मंगलमय, आनंदघनाविषयीं तर बोलावयासच नको! यासाठी मनुष्यावरील श्रद्धा ढळूं देऊं नये; ईश्वरावरील श्रद्धा ढळूं देऊं नये. विषम परिस्थिति उत्पन्न झाली, म्हणजे त्याची कास धरावी व मनुष्याच्या उपाधिसंभव अशा बाह्य रूपाकडे दुर्लक्ष्य करून त्याच्या मूळ स्वभावावर भार टाकावा. म्हणजे विषण्णता वाटणार नाहीं. माणूस विषम परिस्थितीच्या फेऱ्यांत सापडला, म्हणजे त्याला आपल्यास वाटतें तसेंच वाटत असतें. शेक्स्पियरचीं अजरामर शोकपर्यवसायी नाटकें असल्याच परिस्थितींचीं अपत्यें होत. पण ही बाह्य उपाधि शेवटपर्यंत टिकली नाहीं. अन्तीं त्याला मनुष्याचा चांगुलपणा पटला, हें त्याचीं शेवटलीं सर्वांगसुंदर 'सिंबेलाईन,' 'टेंपेस्ट' इत्यादि नाटकें दाखवितात. आपण माझें '**घन तमीं शुक्र बघ ! राज्य करी**' हें गाणें वाचून पाहावें ... ...

आपला,

भा. रा. तांबे

२

के० डॉ० माधवराव पटवर्धन यांचें प्रा. भ. श्री. पंडित यांस पत्र

कोल्हापूर

ता. १९-१२-१९३५.

... ...ओवी आणि अभंग यांविषयीं आपण लिहिलें तें वाचलें. अभंग आणि म्हणावयाची ओवी यांत लयबद्धता मूळचीच आहे, असें मला वाटतें. वाचायची जी ओवी संत-कवींनी हाताळली आहे, ती मात्र गद्यरूप आहे. ... ...

'तांबे-समग्र कविता' या ग्रंथाविषयीं आपण न्यूनें दाखविलीं, हें फार चांगलें केलें. आपलें माझें सहकार्य झालें असतें, तर हीं न्यूनें न राहतीं. पण आपण दूर चांचाला, मी कोल्हापूरला आणि तांबे ग्वाल्हेरीस— अशी स्थिति होती. असो. आपण जीं नवीं साम्य स्थळें सुचविलीं आहेत, त्यांचा समावेश पुढील आवृत्तीच्या वेळीं अवश्य करून घेईन. पुढील आवृत्तीची जुळवाजुळव मी आता— पासूनच करायला लागलों आहें.

नदितिरीं उभा मी दाट तृणीं
धडधडच उरांतल ये श्रवणीं !

ही कविता माझ्या संग्रहीं आहे. पण ती तांबे यांच्याच इच्छेनें गाळण्यांत आली. 'श्रद्धेच्या पंखांवर बसुनी,' 'देशद्रोह की राजद्रोह ?' — या कविता माझ्या संग्रहीं असाव्यात. अवश्य पाठवा. ... ...

आपला,

माधवराव पटवर्धन

३

के० डॉ. पटवर्धन यांचें वा. ना. देशपांडे यांस पत्र

पुणें

ता. ६-१०-१९२७

... 'प्रभे'चें आपण खुल्या मनानें केलेलें परीक्षण वाचून रुचिवैचित्र्याचा चांगला अनुभव आला. 'वृद्ध कवि' लिहितांना माझ्या डोळ्यांपुढे कुणीहि कवि नव्हता. रा. अनंततनय यांची 'चित्रमयजगतां'त प्रसिद्ध झालेली 'अंतर्मनाचे उमाळे' ही कविता वाचून मला फार वाईट वाटलें, आणि खऱ्या कवीनें उदयोन्मुख कवींचें कोड-कौतुक कसें करावें, याच्या चिंतनाच्या भरांत ती कविता बाहेर पडली. इतर कवितांच्या बाबतींत आपला व माझा मतभेद आहे ...

आपला,

माधवराव पटवर्धन

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संपादकीय

(लेखन ता. २० जुलै १९४६)

'युगवाणी' चे अंक प्रसिद्ध होण्यास विलंब होत आहे. याची मला जाणीव आहे. अंक वेळेवर काढण्याचा संपादक व प्रकाशक यांच्या-प्रमाणेच मुद्रकहि आटोकाट प्रयत्न करीत आहेत. परंतु मुद्रणालयांतील अडचणींपुढे बिचारे मुद्रक तरी काय करणार? सर्वच मुद्रणालयांत दिवसेंदिवस कशी विकट परिस्थिति निर्माण होत आहे, हें त्या व्यवसायाची माहिती असणारे लोक जाणतातच. तथापि अडचणींची सबब पुढे करूनच केवळ थांबण्यांत येत नाही, तर प्रयत्नांची शिकस्तहि होत आहे, एवढेंच मी वाचकांस तूर्त सांगूं शकतों.

संपादक व मुद्रणालय एकाच शहरीं नसल्यामुळे मजकुरांत क्वचित् चमत्कारिक चुका होतात. त्यांची जबाबदारी संपादक या नात्याने, अर्थातच, मजकडे येते. तथापि झालेल्या (व पुढे होणाऱ्याहि) चुकां-बद्दल क्षमा मागणें आणि इतःपर अशा चुका होऊं न देण्याची शक्य तितकी काळजी घेणें यापलीकडे मी तरी अधिक काय करूं शकतों?

'साहित्यिकाचा परिचय'

या सदराखाली प्रसिद्ध होणारा मजकूर जसा हातीं येईल, तसा मासिकांत देण्यांत येतो. ज्या साहित्यिकाविषयीं आधीच्या अंकांत परिचयलेख प्रसिद्ध झाला असेल, तो साहित्यिक नंतरच्या अंकांतील परिचयलेख-विषयीभूत साहित्यिकापेक्षा श्रेष्ठ होय, असें समजण्याचें कारण नाही. हे सर्वच साहित्यिक आपापल्या परीने थोर आहेत, असेंच मी समजतों.

एखाद्या साहित्यिकाबद्दल बाहेरून परिचय लेख न आल्यास, किंवा आलेला लेख हवा तसा नसल्यास असा लेख स्वतः मीच लिहितों. मासिकाच्या सजावटीच्या दृष्टीने-व त्या त्या साहित्यिकाबद्दल आदर वाटतो म्हणूनहि मी हें काम करतों. त्यांत दुसरा कसलाहि हेतु नाही. वाङ्मयांतील स्तुति-निंदा सहेतुक करणारे लेखक दुसरे कुणी असतील; 'युगवाणी' च्या सध्याच्या संपादकाचा तसा शिरस्ता नाही, हें त्याला ओळखणारे लोक पूर्णपणें जाणतात!

अमुक एक गृहस्थ 'युगवाणी' च्या संपादनांत हस्तक्षेप करतात, असेंहि एका ठिकाणीं ध्वनित करण्यांत आलें आहे! याबाबत एवढेंच म्हणतों कीं, असा हस्तक्षेप ज्या दिवशीं करण्यांत येईल, त्याच दिवशीं 'युगवाणी' शीं माझा संबंध तुटेल! मला संपूर्ण संपादन—स्वातंत्र्य आहे, असें मी समजतों; आणि संपादनाची सर्व जबाबदारी मजकडेच आहे.

महामहोपाध्याय घुलेशास्त्री

नागपूरचे सुविख्यात संस्कृत पंडित रा. कृष्ण-शास्त्री घुले यांस 'महामहोपाध्याय' ही पदवी देण्यांत आली, याबद्दल मी त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करतों. घुलेशास्त्री हे पट्टीचे विद्वान् आहेत, हें तर खरेंच; पण त्यांची विद्वत्ता 'जडत्व' आणणारी नसून तिच्यांत प्रतिभेचें अपूर्व मिश्रण झालेलें आहे, या गोष्टीचा मला प्रामुख्याने उल्लेख करावासा वाटतो. प्रतिभा व विद्वत्ता यांचा संगम क्वचितच झालेला आढळतो, हें लक्ष्यांत घेतल्यास माझ्या या उल्लेखाचें महत्त्व पटेल. शास्त्रीबोवांचे वैदिक संशोधनावरील प्रबंध त्यांच्या विद्वत्तेबरोबरच त्यांच्या प्रतिभाशालित्वाचीहि साक्ष पटवितात.

म. म. घुलेशास्त्री यांचें वाङ्मय संकलनरूपाने प्रकाशित करण्याची योजना आखण्यांत आली आहे, ही अत्यंत उचित गोष्ट होय.

नागपूरचे दुसरे प्रतिभासंपन्न विद्वान् डॉ. के. ल. दप्तरी यांचे नियतकालिकांत विखुरलेले स्फुट लेखहि असेच ग्रंथरूपाने संकलित व्हावयास पाहिजेत. त्याचप्रमाणे, त्यांचे उपनिषदांवरील अप्रकाशित इंग्रजी-मराठी ग्रंथ व इतर वाङ्मयहि सत्वर प्रकाशित होणें जरूर आहे.

म. म. घुलेशास्त्री यांजवरील परिचयलेख मिळावा, म्हणून मी गेल्या वर्षापासून प्रयत्न करीत आहें. ज्या लेखकाने तो लेख लिहावयास घेतला

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आहे, त्याजकडून तो हातीं पडतांच ' युगवाणीं ' त प्रसिद्ध करण्यांत येईल.

दोन सदरें

' ओझरतें दर्शन ' हें संकलित सदर पुढील अंकीं प्रथमच देण्यांत येणार आहे, त्याकडे मी वाचकांचें लक्ष्य वेधूं इच्छितों. तसेंच पुढील अंकापासूनच ' संशोधकाचें पान ' हें नवें सदर सुरू होईल. वऱ्हाड-मध्यप्रांतांत ऐतिहासिक कागदपत्रें, प्राचीन ग्रंथ-वगैरे किती तरी साधनें अभ्यासकांची वाट पाहत पडलेलीं आहेत. त्यांचा थोडक्यांत परिचय करून देण्याचें योजिलेलें आहे. या कार्यात सुप्रसिद्ध संशोधक डॉ. य. खु. देशपांडे व त्यांची ' शारदाश्रम ' संस्था यांचें सहकार्य लाभणार आहे, हें कळविण्यास मला आनंद वाटतो

' संशोधकाचें पान ' हें सदर अभ्यासकांप्रमाणे सामान्य वाचकांसहि मनोरंजक वाटेल, अशी खबरदारी शक्य तों घेण्यांत येईल.

नागपूर विद्यापीठास सूचना

वऱ्हाड-मध्यप्रांतांतील ऐतिहासिक व वाङ्मयीन साधनांचें वैपुल्य ध्यानांत घेतां, त्यांच्या प्रसिद्धि-करणार्थ स्थायि व पद्धतशीर प्रयत्न होण्याची आवश्यकता जोराने वाटूं लागते. नागपूर विद्यापीठाने प्राचीन हस्तलिखितांचा संग्रह करण्याचा स्तुत्य उपक्रम सुरू केला आहे. आता एक पाऊल पुढे टाकून विद्यापीठानें जुनीं कागदपत्रें व ग्रंथ छापण्या-साठीं एखादें मासिक वा त्रैमासिक तातडीनें सुरू करावें, अशी त्यास आग्रहाची सूचना आहे. हें नियतकालिक तूर्त मराठी भाषेपुरतेंच मर्यादित असावें. त्यांत दर अंकीं कांही जुनीं कागदपत्रें व एकदोन अप्रकाशित ग्रंथ क्रमशः देण्यात यावे. केवळ महानुभाव वाङ्मयापुरतें पाहिलें, तरी अजून शेकडों महत्त्वाचें ग्रंथ अप्रकाशित असल्याचें निदर्शनास येईल. किंबहुना, केवळ महानुभाव वाङ्मय प्रसिद्ध करण्यासाठीच एखादें स्वतंत्र नियतकालिक निघालें, तरी तें हवें आहे. इतर अप्रकाशित वाङ्मयहि थोडेंथोडकें नाही.

नागपूर विद्यापीठ या सूचनेकडे लक्ष्य देईल काय ?

वाचकांस सूचना—

वेळेच्या अभावीं आणि इतरहि अपरिहार्य कारणांमुळे या अंकांत चार पानांचा मजकूर कमी घावा लागत आहे. पुढील अंकीं चार पानांचा जास्त मजकूर देऊन भरपाई करून देण्यांत येईल.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'युगवाणी'चें स्वागत

प्रथमांकावरील कांही अभिप्रायांतील उतारे

"विदर्भ-साहित्य-संघाचें १९४४ सालीं जें पुनरुज्जीवन झालें, त्याचें प्रमाण म्हणजे संघातर्फे सुरू करण्यात आलेलें संघाचें मुखपत्र 'युगवाणी' हें होय. सुप्रसिद्ध टीकाकार, संशोधक, काव्यसमीक्षक व कवि श्री. वा. ना. देशपांडे यांनी त्याचें वर्षभर निर्वेतन संपादन करावयाचें ठरविलें आहे...

या प्रथमांकावरून व त्यांतील संपादकीयावरून विदर्भ-साहित्य-संघातर्फे प्रसिद्ध होणारें हें मासिक संघाप्रमाणेच 'मराठी भाषा व मराठी साहित्य यांची अभिवृद्धि' करील, 'प्रांतीयता व जातीयता यांच्यापासून सर्वस्वीं अलिप्त राहील,' असें दिसतें. हें धोरण कटाक्षानें पाळलें जाण्याबाबत, श्री. देशपांडे संपादक आहेत तोंवर, शंकेला जागा नाही...

...प्रस्तुत अंकांत कै. आगरकरांचें सुंदर पत्र त्या सदरांत ('गुप्त सरस्वती' या सदरांत) आलें आहे. थोर साहित्यिकांचीं पत्रें वाचणें उद्‌बोधक होईल, यांत संदेह नाही...

...'बी' कवींची 'पिकलें पान' ही तांब्यांच्या 'मधुघटा'ची आठवण करून देणारी सुंदर कविता हें या अंकाचें अनन्यसाधारण वैशिष्ट्य होय...

—'मौज,' मुंबई, २९ मे १९४६.

२

..."श्री. देशपांडे यांच्या टोपण नांवांशीं आणि त्या त्या टोपण नांवाखाली आजवर प्रसिद्ध झालेल्या साहित्याशीं ज्या कोणाचा परिचय असेल, त्यांना त्यांच्या मार्मिक आणि सरस-रमणीय टीकालेखनाविषयीं कांही सांगावयास नको. विचारांची शुचिता आणि निःस्पृहपणा हे त्यांचे दोन गुण फारच थोड्या लेखकांच्या अंगीं आढळून येतात. सौंदर्याच्या आवरणाखाली उथळपणा आणि विकृत विचार झाकून ठेवण्याचा 'नेत्रदीपक' फुलोरा ते कधींहि उभा करणार नाहींत!......

या पहिल्या अंकांत श्री. देशपांडे यांनी प्रा. बनहट्टी यांचा व्यक्तिपरिचय करून दिलेला असून, आचार्य कालेलकर यांचा 'नवनिर्मिति आणि टीकाखोर वृत्ति' हा अत्यंत मार्मिक लेख, रियासतकार सरदेसाई यांचा 'मराठेशाहींतील ऐतिहासिक स्त्रियांचें कर्तृत्व' हा माहितीपूर्ण लेख, प्रा. बनहट्टी यांचा 'विदर्भ-साहित्य-संघा'च्या कार्याची ओळख करून देणारा लेख आणि इतर लघुकथा, लघुनिबंध, कविता वगैरे वाचनीय मजकूर आला आहे......"

—'समीक्षक', मुंबई, जून, १९४६.

साभार स्वीकार

पुस्तकें—१ दोन घडीचा डाव—लीला देशमुख. **२ मानला तर देव**—ना. वि कुलकर्णी. **३ मृगाचा पाऊस**—पद्माकर निमदेव. **४ अलकेचा प्रवासी**—बी. रघुनाथ.

अभिप्राय सवडीप्रमाणे देण्यांत येईल.

नियतकालिकें—१ 'सत्यकथा'. २ 'चित्रमय-जगत्'. ३ 'किर्लोस्कर'. ४ 'वऱ्हाड-शाळा-पत्रक'. ५ 'मंदार'. ६ 'भारत-इतिहास-संशोधक-मंडळा'चें त्रैमासिक. ७ 'सेवक'. ८ 'मौज'. ९ 'महाराष्ट्र साप्ताहिक. १० 'मातृभूमि.' ११ 'नवा मनु.'

कागदाच्या टंचाईमुळे 'अभिरुचि,' 'समीक्षक' 'नवयुग' व 'भवितव्य' हीं नियतकालिकें 'युगवाणी' कडे स्वतंत्र येत नाहींत, संपादकाकडे व्यक्तिशः येतात. त्यांनी अभिप्राय वगैरे देऊन 'युगवाणी' स उपकृत केलें आहे.

हें मासिक रा० **तु. मा. पाटील** यांनी श्री० ह. व्या. प्र. मंडळाच्या सरस्वती मुद्रणालयांत छापलें व प्रा० **ना. कु. दिवाणजी**, एम्. ए., सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ यांनी अमरावती येथे संघाच्या कार्यालयांत प्रसिद्ध केलें.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष

प्रा. श्री. ना. बनहट्टी यांचे ग्रंथ

ज्ञानोपासना आणि भारतीयांचें कर्तव्य (दुसरी आवृत्ति) किं. २ रु.

सध्याच्या राष्ट्रीय जागृतीच्या काळीं या ग्रंथाचें वाचन प्रत्येकानें करणें अवश्य आहे.

मयूरकाव्यविवेचन किं. २॥. रु.

कविवर्य मोरोपंतांवरील प्रमाणभूत ग्रंथ

एकावळी किं. १॥ रु.

विख्यात साहित्यिकांचीं सुंदर व्यक्तिचित्रें

विष्णुपदी किं. ४ रु.

विष्णुशास्त्री चिपळूणकरांचे संकलित लेख–सुमारें ३०० पानें दुर्मिळ व अप्रसिद्ध मजकूर.

‘युगवाणी’ मासिकाचे संपादक

रा. वामन नारायण देशपांडे यांचा काव्यसंग्रह

आराधना—

महाविदर्भांत सर्वोत्कृष्ट ठरून नागपूर विद्यापीठातर्फे के. ना. वेहेरे पारितोषिक, मिळविणारा सर्वोत्कृष्ट काव्य–ग्रंथ.

फक्त १० रु. मनीऑर्डरीनें पाठविणारांस वरील ग्रंथ रजिस्टर्ड पोस्टानें घरपोंच पाठविण्यांत येतील.

सुविचार प्रकाशन मंडळ, लि०

काँग्रेसनगर, नागपूर.

वऱ्हाड-मध्यप्रांतांतील सर्वांत जुनें आणि एकमेव मराठी शैक्षणिक मासिक

वर्ष ७२ वें] वऱ्हाडशाळापत्रक [वा. व. फक्त रु. २॥.

संपादक— रा. रा. द. देशपांडे

या शैक्षणिक मासिकाचे आजच वर्गणीदार व्हा !!

—व्यवस्थापक ‘वऱ्हाडशाळापत्रक’ अमरावती कँप (वऱ्हाड).

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ